
प्रभाते मनी
आसावरी काकडे
BUSINESS ICON

# प्रभाते मनी

आसावरी काकडे

BUSINESS ICON
www.businessicon.in

# प्रभाते मनी

Prabhate Mani

© सर्व हक्क लेखिकेच्या स्वाधीन

**लेखिका :**

आसावरी काकडे

डी १/३, स्टेट बँक नगर, कर्वे नगर, पुणे ४११०५२

दूरभाष : ९७६२२०९०२८/ ईमेल : asavarikakade@gmail.com

**मुद्रक व प्रकाशक :**

बिझनेस आयकॉन

२३५/ब/२, परेश अपार्टमेंट्स्, पर्वती, पुणे ४११००९

मोबाईल : +९१ ९८९००४००१३/ईमेल : info@businessicon.in

मुखपृष्ठ : पराग गोरे

**मांडणी :**

होरायझन स्प्रेड मीडिया सर्व्हिसेस

मोबाईल : +९१ ९८९०० ४००१३

प्रथम आवृत्ती : ३ मे २०२२

(ऑनलाईन वाचनासाठी ई-पुस्तक स्वरूपातही उपलब्ध)

किंमत : रु. १७५/-

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

|| कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ||

# लेखिकेचा परिचय



**आसावरी श्रीनिवास काकडे**
बी.कॉम., एम.ए. मराठी, एम.ए. तत्त्वज्ञान
'सेतू' डी १/३, स्टेटबँकनगर, कर्वेनगर, पुणे, ४११०५२ .
फोन नं. ९४२१६७८४८० / ९७६२२०९०२८
Email- asavarikakade@gmail.com
Website- www.asavarikakade.com

**जन्मतारीख–** २३ जानेवारी १९४९
**व्यवसाय–** भारतीय स्टेटबँकेतून निवृत्त

**प्रकाशित पुस्तके :**

**गद्यलेखन –**
* 'कवितेभोवतीचं अवकाश' (लेखसंग्रह)
* 'ईशावास्यम् इदं सर्वम्.. : एक आकलन-प्रवास' (तत्त्वज्ञान)
* 'अथांग'- (अनुवादित कादंबरी) बिन्द्या सुब्बा यांच्या 'अथाह' या साहित्य अकादेमी पुरस्कार प्राप्त मूळ नेपाळी कादंबरीचा मराठी अनुवाद.
* आनंदी गोपाळ (कादंबरी- संक्षिप्त आवृत्ती) श्री. ज. जोशी यांच्या आनंदी गोपाळ या कादंबरीचे कुमारवयीन मुलांसाठी संक्षिप्तीकरण

**कवितासंग्रह–**

**मराठी – ९**

‘आरसा’, ‘आकाश’, ‘लाहो’, ‘मी एक दर्शनबिंदू’, ‘रहाटाला पुन्हा गती दिलीय मी’, ‘स्त्री असण्याचा अर्थ’, ‘उत्तरार्ध’, ‘व्यक्त-अव्यक्ताच्या मध्यसीमेवर’ आणि ‘भेटे नवी राई’

**हिंदी – ३**

‘मौन क्षणों का अनुवाद’, ‘इसीलिए शायद’, आणि ‘मेरे हिस्से की यात्रा’- (स्वतःच्या निवडक मराठी कवितांचा हिंदी अनुवाद. या हिंदी अनुवादाचा तमिल अनुवाद प्रकाशित झाला आहे.)

**अनुवादित – ४**

✼ ‘बोल माधवी’ (चन्द्रप्रकाश देवल यांच्या ‘बोलो माधवी’ या हिंदी कवितासंग्रहाचा अनुवाद),

✼ ‘तरीही काही बाकी राहील’ (विश्वनाथ प्रसाद तिवारी यांच्या निवडक हिंदी कवितांचा अनुवाद),

✼ ‘लम्हा लम्हा’ (दीप्ति नवल यांच्या ‘लम्हा लम्हा’ या कवितासंग्रहाचा अनुवाद),

✼ ‘तू लिही कविता’ (डॉ. दामोदर खडसे यांच्या ‘तुम लिखो कविता’ या कवितासंग्रहाचा अनुवाद)

**बालगीतसंग्रह – ५**

‘टिक टॉक ट्रिंग’, ‘अनु मनु शिरू’, ‘जंगल जंगल जंगलात काय?’(इसाप गाणी), ‘भिंगोऱ्या भिंग’, आणि ‘ऋतुचक्र’

**ई–पुस्तके – ९**

‘आकलनाच्या नव्या तिठ्यावर’ (छायाचित्र-कविता)
‘विचारांचे कवडसे’ (लेख संग्रह)
‘विचारार्थ’ (लेख संग्रह)
‘आनंदाचा अनुकार’ : ज्ञानेश्वरीतील उपमादृश्ये
‘Thoughts in a Nutshell’ by L. K. Apte (मराठी भावानुवाद)
‘अंत ना आरंभ’ (लेख संग्रह)
‘आकाश’ कवितासंग्रह- ईआवृत्ती
‘लाहो’ कवितासंग्रह- ई आवृत्ती
‘प्रत्ययांचे बिंब’ : छायाचित्र-कविता
‘प्रभाते मनी’ (चिंतनपर लेखन)

**ब्लॉग्ज –**

‘ब्लॉग, एक नवी सुरुवात’ या ब्लॉगमधे विषयानुसार बनवलेले दहा ब्लॉग्ज एकत्रित.
(http://www.asavarikakade.blogspot.com)

**काही महत्त्वाचे पुरस्कार –**

❊ ‘बोल माधवी’- साहित्य अकादेमी, नवी दिल्लीचा अनुवाद पुरस्कार २००६
❊ ‘इसीलिए शायद’- केंद्रीय हिंदी निर्देशालय, नवी दिल्लीचा ‘हिंदीतर भाषी हिंदी लेखक पुरस्कार
❊ ‘मेरे हिस्से की यात्रा’- महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीचा संत नामदेव पुरस्कार
❊ ‘आरसा’ आणि ‘मी एक दर्शनबिन्दू’ या संग्रहांना महाराष्ट्र राज्य पुरस्कार
❊ बालसाहित्यासाठी औरंगाबादच्या परिवर्तन संस्थेचा कै. ग.ह. पाटील पुरस्कार
❊ ‘कवितेभोवतीचं अवकाश’- आचार्य अत्रे स्मृति प्रतिष्ठान केशवकुमार आचार्य अत्रे पुरस्कार
❊ ‘ईशावास्यम् इदं सर्वम्...’- सार्वजनिक वाचनालय, नाशिकचा ग. वि. अकोलकर पुरस्कार.
❊ एकूण लेखनासाठी गो. नी.दांडेकर स्मृति ‘मृण्मयी’ पुरस्कार,
❊ पुणे मराठी ग्रंथालय, पुणेचा साहित्य सम्राट न. चिं. केळकर पुरस्कार, गोमंत विद्या निकेतन, मडगाव, गोवा या संस्थेच्या वतीने दिला जाणारा दामोदर अच्युत कारे गोमंतदेवी पुरस्कार. २०२१

**इतर सन्मान–**

❊ इयत्ता सातवी ते एम. ए. पर्यंतच्या विविध वर्गांच्या अभ्यासक्रमात व विविध संपादित संग्रहांमधे वरील संग्रहांमधील कवितांचा समावेश.
❊ आकाशवाणी, नवी दिल्ली तर्फे आयोजित सर्वभाषी कविसंमेलनात(२००२) मराठीचे प्रतिनिधित्व
❊ हिंदी साहित्य सम्मेलन, प्रयाग (अलाहाबाद) द्वारा ‘सम्मेलन सम्मान’- २००४
❊ अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासह अनेक महत्त्वाच्या साहित्यिक कार्यक्रमांमधे कवितावाचन, निबंधवाचन, भाषण अशा प्रकारचा सहभाग.

❊❊❊

# अनुक्रम

मनोगत / ८-९

तुकोबांचा आकांत-प्रवास : ११ भाग / १०-२३

चांगदेवपासष्टी : एक आकलन : १४ भाग / २४-५५

गीता आणि आपण : १६ भाग / ५६-९६

# मनोगत

'तो आला, त्यानं पाहिलं, त्यानं जिंकलं..' हे स्मार्ट फोनच्या बाबतीतही म्हणता येईल इतका त्यानं आपल्या जगण्याचा ताबा घेतला आहे. कारण आपल्या सध्याच्या जीवनशैलीत आवश्यक होऊन बसलेल्या या फोननं, कॅमेरा, घड्याळ, कॅल्क्युलेटर, रेडिओ, टीव्ही, बँकिंग, शब्दकोष, ग्रंथभांडार, मार्गदर्शक... हे सगळं 'अंडर वन रूफ', तेही अगदी आपल्या हातात आणून ठेवलंय..! त्याच्याशिवाय आता आपलं पानही हलेनासं झालं आहे..!

या अनेक सुविधांपैकी व्हॉट्सॅप या माध्यमाचा वापर बघता बघता सर्वांच्या खूपच अंगवळणी पडला आहे. सुरुवातीला याचा अगदी किरकोळ, काहीसा उथळ वापर होत होता. पण आता त्याच्या जोडीनं याचा विधायक आणि सर्जनशील वापरही होऊ लागला आहे. बऱ्याच व्हॉट्सप ग्रुपवर अर्थपूर्ण उपक्रम चालतात. माझा एक ग्रुप बनवून मीही 'सुप्रभात'च्या निमित्तानं जवळच्या सगळ्यांशी संपर्कात राहण्याची सोय केलीय. त्यावर सुप्रभात म्हणून पाठवण्यासाठी फोटो काढणे आणि त्या फोटोवर कवितेच्या चार-दोन ओळी लिहिणे हा छंद बरेच दिवस चालला. त्याला खूपच छान प्रतिसाद मिळाला. कधी कवितारूपात तर कधी खूप आवडल्याचं कळवून.

सृजनाला साद घालत दिवसाची सुरुवात करून देण्यातला आनंद सुखावणारा होता. नंतर मी जरा वेगळे उपक्रम घेऊ लागले. फोटो-काव्य हेच सूत्र असलेले 'ज्ञानेश्वरीतील उपमा', 'Thoughts in a Nutshell' असे माझे दोन ब्लॉग आहेत. काही दिवस त्यातले फोटो-काव्य शेअर केले. नंतर मी पूर्ण वेगळे, विचारांना चालना देऊन अंतर्मुख करणारे तीन उपक्रम घेतले. आठवड्यातून एक-दोनदा घेतलेल्या या उपक्रमांनाही छान प्रतिसाद मिळाला. अर्थपूर्ण चर्चा झाल्या. २०२० साली घेतलेले ते उपक्रम असे -

**(१) 'तुकोबांचा आकांत–प्रवास..'** - या उपक्रमांतर्गत संत तुकारामांचे निवडक अभंग घेऊन त्यातून त्यांच्या आंतरिक परिवर्तनाचा प्रवास उलगडून दाखवण्याचा प्रयत्न केला. (२) **'चांगदेवपासष्टी : एक आकलन'** – चांगदेवपासष्टीतल्या ओव्यांचे आजच्या

मराठीत मी केलेले पद्य-रूपांतर आणि त्यावरचे छोटेसे भाष्य शेअर करणे असं या उपक्रमाचं स्वरूप होतं. (३) **'गीता आणि आपण..'** या उपक्रमात गीतेतले महत्त्वाचे श्लोक, त्यांचे गीताईतील मराठी रूपांतर, ज्ञानेश्वरीतल्या त्यावर भाष्य असलेल्या एक-दोन समर्पक ओव्या, सरळ अर्थ आणि अर्थविस्तार अशी मांडणी केली होती.

या निमित्तानं या विषयांचा अभ्यास झाला. त्यावर विचार झाला. छान चर्चा झाल्या. अर्थात याला व्हॉट्सअ‍ॅप या माध्यमाच्या मर्यादा होत्या. त्यामुळे उपक्रमासाठी निवडलेले विषय व्यापक असूनही मी अगदी थोडक्यात आणि सहज समजेल अशा भाषेत लिहिलेलं आहे. मोबाईल स्क्रीनमागे हे लुप्त होऊन जाऊ नये, सलगपणे परत वाचता यावं म्हणून या तीन महत्त्वाच्या उपक्रमांचं 'प्रभाते मनी' या नावानं संकलन केलं आहे. यामधे ग्रुपवर झालेल्या चर्चांचा समावेश करता आला नाही. पण आता ते ई-पुस्तकरूपात अनेकांना वाचता येईल आणि त्यावर खुलेपणानं चर्चा होऊ शकेल...

या पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी माझा भाचा पराग गोरे यानी सहर्ष स्वीकारली आणि समर्पक मुखपृष्ठ, उत्तम लेआऊट करून या महत्त्वाच्या विषयांवरील ई-पुस्तकाची आस्थेने निर्मिती केली. त्याच्याच 'बिझनेस आयकॉन' प्रकाशनातर्फे आता ते प्रकाशित होत आहे. या उत्तम निर्मितीबद्दल त्याचं कौतुक करत मी समाधान व्यक्त करते.

- आसावरी काकडे

# तुकोबांचा आकांत–प्रवास

## तुकोबांचा आकांत – प्रवास

# प्रास्ताविक

संतांनी समाजाला निष्क्रीय केलं... अशा काही मतांच्या प्रभावामुळे मी सुरुवातीला संतसाहित्यापासून चार हात दूर होते. पण एकदा कवी ग्रेस यांच्या 'चर्चबेल' या पुस्तकातला 'आकांताचे देणे' हा संत तुकारामांच्या व्यक्तित्वाची महानता लक्षात आणून देणारा लेख वाचनात आला आणि मला एकदा तरी गाथा वचायला हवी असं तीव्रतेनं वाटलं. गाथा वचायला सुरुवात केल्यावर लगेच काही फारसं भावलं नाही. पण हळूहळू त्यात गुंतत गेले. अभंगातील ईश्वरभेटीचा सच्चा आकांत समजून घ्यावासा वाटला. ईश्वरभेट म्हणजे नेमकं काय अभिप्रेत असेल याचा विचार होत राहिला. अनेक अभंगांतील उत्कट आत्मसंघर्षातून जाणवलं, की त्यांचा हा आकांत खरंतर स्वतःतील सर्व मर्यादा पार करत अत्यंत उन्नत अवस्थेप्रत पोचण्यासाठी चाललेला होता. तिथवर पोचल्यावरच ईश्वरभेट होईल किंवा ती अवस्था प्राप्त होणं हीच ईश्वरभेट असेल... अशी त्यांची धारणा असावी. दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्या 'पुन्हा तुकाराम' या पुस्तकाच्या वाचनातून माझ्या या समजुतीला दुजोरा मिळाला... या संदर्भात हे पुस्तक पुन्हा पुन्हा वाचण्यासारखं आहे. संत तुकारामांची अभंग-गाथा म्हणजे 'तुकोबा ते विठोबा' या आकांत-प्रवासाचंच शब्दांकन आहे. चिंतन-मननाचा भाग म्हणून या दीर्घ प्रवासातले टप्पे दर्शवणारे काही अभंग निवडून मी माझ्यापुरते लिहून काढले.

संत तुकारामांचा हा आंतरिक प्रवास कुठून कुठे, कसा झाला असेल, किती संघर्ष झाला असेल याचा निर्देश असलेले ते अभंग अकरा भागात इथं शेअर करण्याचा विचार आहे. ही निवड करताना मला काय वाटलं तेही सोबत थोडक्यात देईन. निवडलेल्या अभंगांचा अनुक्रम गाथेत आहे तसा नाही. पुढचा टप्पा वाटावा अशा आशयाचा अभंग सुरुवातीलाच आहे. तर आंतरिक संघर्षाच्या प्राथमिक अवस्थेचा निर्देश पुढल्या अभंगातही पुन्हा पुन्हा आला आहे.

(१२.०१.२०२०)

***

## १) जाऊ देवाचिया गावा

'तुकोबा ते विठोबा' या आकांत-प्रवासाची सुरुवात परंपरागत चालत आलेल्या घरातील विठ्ठलपूजेपासून झाली. त्यात केवळ संस्कारातून आलेला भक्तिभाव असेल असं सुरुवातीच्या अभंगांमधून जाणवतं.. 'सुंदर ते ध्यान, उभे विटेवरी । कर कटावरी ठेवूनिया' (१) 'राजस सुकुमार मदनाचा पुतळा । रविशशीकळा लोपलिया..' (२) 'सदा माझे डोळा जडो तुझी मूर्ती । रखुमाईच्या पती सोयरिया..' (३)... अशा शब्दात वेगवेगळ्या प्रकारे ईश्वराच्या रूढ झालेल्या सगुण रूपाचं वर्णन करत, त्याला अत्यंतिक खरेपणानं आळवत तुकारामांनी भक्तीच्या उत्कटतेची चढती कमान गाठली. त्यांच्या भक्तीचं अतिशय भावपूर्ण रूप असलेला एक अभंग-

जाऊ देवाचिया गावा ।
देव देईल विसावा ।।

देवा सांगो सुखदुःख ।
देव निवारील भूक ।।

घालू देवासीच भार ।
देव सुखाचा सागर ।।

रहो जवळी देवापाशी ।
आता जडोनि पायांसी ।।

तुका म्हणे आम्ही बाळे ।
या देवाची लडिवाळे ।। (१८७१)

(१९.०१.२०२०)

***

## २) धरी मना सोय विठोबाची...

'जाऊ देवाचिया गावा । देव देईल विसावा...' हा भक्तिभाव सतत अनुभवता यावा म्हणून तुकोबा मनोभावे विठ्ठल-पूजा करत होते. अभंगांमधून त्याच्या सगुण रूप-गुणांचं वर्णन करत आळवणंही चालू होतं. मात्र हे करत असताना त्यांची प्रखर विवेकबुद्धी अशा भक्तीच्या आड येत असावी. मन विचलित करणारे प्रश्न त्यांना पडत असावेत... एका अभंगात त्यांनी म्हटलंय,

जळो ती जाणीव जळो शहाणीव । राहो माझा भाव विठ्ठलापायी ।।
जळो तो आचार जळो तो विचार । राहो मन स्थिर विठ्ठलापायी ।।
जळो हा लौकिक जळो दंभमान । लागो जीवा ध्यान विठ्ठलाचे ।।
जळो हे शरीर जळो हा संबंध । राहो परमानंद माझ्या कंठी ।।
तुका म्हणे येथे अवघे चि होय । धरी मना सोय विठोबाची ।।३८०७।।

या अभंगात जाणीव.. शहाणीव, आचार.. विचार, लौकिक.. दंभ, शरीर.. संबंध.. विचलित करणारं हे काही काही नको. फक्त एका विठ्ठलापायी माझा भाव राहू दे अशी इच्छा तुकोबा व्यक्त करतायत. यातली शेवटची ओळ मला फार महत्त्वाची वाटली. या ओळीतला सोय शब्द विशेष लक्षवेधी आहे. लौकिक जगण्याशी संबंधीत हे सगळं जेव्हा स्वास्थ्य हिरावून घेऊ लागतं तेव्हा त्यात अतिरिक्त गुंतण्यातून बाहेर पडायचं असेल तर मनाला काहीतरी व्यवधान असावं लागतं. व्यवधानासाठीची एक सोय म्हणून 'विठोबाला धरून ठेव' असं तुकोबा आपल्या मनाला सांगतायत. 'जळो शहाणीव..' असं म्हणत शेवटी एक शहाणा विचार तुकोबा आपल्या हातात ठेवतायत असं मला वाटलं...

मात्र 'तुका म्हणे येथे अवघे चि होय'चा अर्थ 'धरी मना सोय'शी कसा जोडून घ्यावा ते नीटसं कळालेलं नाही...

(२६.१.२०२०)

***

## ३) देवाची ते खूण..

घरात परंपरेनं चालत आलेली विठ्ठल-पूजा करता करता तुकोबांना एका बाजूला भक्तीचा आधार वाटतोय तर दुसऱ्या बाजूला त्यांचा विवेक जागा आहे. तो त्यांना कर्मकांडात्मक भक्तीपासून विचलित करतोय. तरी ते 'धरी मना सोय विठोबाची..' असा मधला मार्ग काढत अत्यंतिक निष्ठेनं सगूण भक्तीत रमण्याचा प्रयत्न करत राहिले. 'जळो ती जाणीव जळो शहाणीव । राहो माझा भाव विठ्ठलापायी ।।' ही इच्छा तीव्रतम होत राहिली. एकेक करत असण्याचं भानही विरघळू लागलं. या अवस्थेचं चित्रण करताना एका अभंगात म्हटलंय, एका वेळे केले रिते कलिवर । आत दिली थार पांडुरंगा ।। (३५०२) स्वतःला पूर्ण रिकामं करून पांडुरंगाला आत जागा करून दिली...! भक्ती ही एक मानसिक प्रक्रिया आहे. भक्तिभाव दृढ होत जातो तसा तो जगण्यातून प्रकट व्हायला लागतो. तुकारामांनी पूर्ण भक्तीच्या खुणा स्वतः अनुभवून एका अभंगात सांगितल्या आहेत.

देवाची ते खूण आला ज्याच्या घरा । त्याच्या पडे चिरा मनुष्यपणा ।।
देवाची ते खूण करावे वाटोळे । आपणा वेगळे कोणी नाही ।।
देवाची ते खूण गुंतो नेदी आशा । ममतेच्या पाशा शिवो नेदी ।।
देवाची ते खूण गुंतो नेदी वाचा । लागो असत्याचा मळ नेदी ।।
देवाची ते खूण तोडी मायाजाळ । आणि हे सकळ जग हरी ।।
पहा देवे तेचि बळकाविले स्थळ । तुक्यापें सकळ चिन्हें त्याची ।। (३४४६)

आशा, ममतेचा पाश, असत्य.. अशा गोष्टींनी लडबडलेल्या सामान्य मनुष्यपणाला तडा जाणं ही देवत्वाची प्रचिती आल्याची खूण आहे. या अभंगात देवाची खूण म्हणून सांगितलेल्या सर्व गोष्टी आंतरिक परिवर्तन दर्शवणाऱ्या आहेत. भक्ती म्हणजे वरवरची पूजाअर्चा नाही. तर ती आंतरिक परिवर्तनासाठीच्या स्व-संघर्षाची दीर्घ प्रक्रिया आहे असं तुकोबांना वाटत असणार. त्यांच्या लेखी ईश्वरभेटीचा ध्यास म्हणजे आंतरिक परिवर्तनाचा ध्यास. जे हवं आहे ते, तसं आपण स्वतःच व्हायचं..! हा ध्यास- हा लाहो त्यांच्या अभंगात वारंवार व्यक्त झाला आहे. (गाथा वाचताना आंतरिक परिवर्तनाचा ध्यास या अर्थी वारंवार आलेला लाहो शब्द मला त्याच्या उत्कट आशयासह इतका आवडला की माझ्या एका कवितासंग्रहाला मी 'लाहो' हे शीर्षक दिलंय.)

(२.२.२०२०)

***

## ४) बोलविसी तैसे आणीं अनुभवा

देवाची ते खूण... म्हणून सांगितलेल्या सर्व खुणा आपल्यात उतरल्या आहेत असं जाणवून समाधानाने 'तुक्यापें सकळ चिन्हें त्याची' असं म्हटलं खरं पण हे परिवर्तन कायमसाठी झालंय का? 'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती..' असं जाणवतंय तेही फक्त विचारातलं सान्निध्य आहे काय? स्वतःला परखडपणे तपासताना भक्तिभावाच्या आतला तुकोबांचा विवेक त्यांना असे प्रश्न विचारत सतत सावध करत राहिला. हे सगळं कवित्व, अनुभवांना शब्दरूप देणं हे केवळ 'मज विश्वंभर बोलवितो...' म्हणून आहे. माझं त्यात काही नाही अशी त्यांची भावना असल्यामुळे पुन्हा पुन्हा छोट्या 'मी'पणाशी परतणारा प्रत्यक्ष जगण्यातला प्रत्येक अनुभव त्यांना विद्ध करत होता. एका अभंगात ते विठ्ठलाला म्हणतात- 'अजून न काही आले अनुभवा । आधीच मी देवा कैसे नाचो ।।' अशा आशयाचे बरेच अभंग गाथेमधे जागोजागी आहेत. त्यातील एक पूर्ण अभंग असा-

बोलविसी तैसे आणीं अनुभवा । नाही तरी देवा विटंबना ।।
मिठेविण काय करावे मिष्टान्न । शव जीवेविण शृंगारिले ।।
संपादणीविण विटंबिले सोंग । गुणेविण चांग रूप हीन ।।
कन्यापुत्रेविण मंगळदायके । वेचिले हे फिके द्रव्य तरी ।।
तुका म्हणे तैसी होते मज परी । न देखे अंतरी प्रेमभाव ।।३०४।।

जगण्यातल्या प्रत्येक कृतीत अत्यंतिक प्रेमभाव उतरत नाही तोपर्यंत अधुन मधून येणाऱ्या क्षणिक अनुभवाला, त्याचं शब्दांकन करण्याला काही अर्थ नाही. वरील अभंगात वेगवेगळी उदाहरणं देऊन हे निरर्थकत्व तुकोबांनी अधोरेखित केलेलं आहे. खऱ्या भक्तीची ओढ असूनही विवेकबुद्धीने ते स्वतःला असे सतत पारखत राहतात. त्यांच्या अभंगांमधला हा जाज्वल्य आत्मसंघर्ष विलक्षण आहे.

(९.२.२०२०)

***

## ५) तुका म्हणे काय जालासी निर्गुण

‘बोलविसी तैसे आणीं अनुभवा । नाही तरी देवा विटंबना ।।’, ‘काहो माझ्या काही नये अनुभवा...’ असं परोपरीनं म्हणत आत्मक्लेष करताना तुकोबांना एका बाजूनी, ‘तुका म्हणे नाही पालट अंतरी । तेथे दिसे हरी ठकाठकी ।।’(१९०६) अशी आपल्यातलीच उणीव जाणवतेय तर दुसऱ्या बाजूनी देवातच काहीतरी खोट असली पाहिजे अशी शंका येतेय. मग ते सरळ विठ्ठलालाच जाब विचारतात-

काय तुझे वेचे मज भेटी देता । वचन बोलता एक दोन ।।
काय तुझे रूप घेतो मी चोरोनि । त्या भेणे लपोनी राहिलासी ।।
काय तुझे आम्हा करावे वैकुंठ । भेऊं नको भेट आता मज ।।
तुका म्हणे तुझी नलगे दसोडी । परि आहे आवडी दर्शनाची ।।(१६२६)

तुझं रूप मी चोरून घेईन म्हणून घाबरून लपून राहिला असलास तर भिऊ नकोस.. तुझं वैकुंठ वगैरे आम्हाला काही नको आहे. फक्त येऊन एकदा भेट आता. बाकी काही नको. तुझ्या दर्शनाची आस तेवढी आहे...

साधारण याच आशयाच्या दुसऱ्या एका अभंगात काकुळतीनं विचारलंय, ‘भेटीची अशी टाळाटाळ का करतो आहेस देवा?’ या व्याकुळ प्रश्नामागे भोवतीच्या समाजातील अनेकांचे दुःख उभे आहे. ते वास्तव नाकारून विठ्ठल-भक्ती शक्य नाहीए. या अभंगात पुढे म्हटलंय,

कोण तुम्हा सुख असे या कौतुके । भोगितां अनेकें दुःखे आम्ही ।
तुका म्हणे काय जालासी निर्गुण । आम्हा येथे कोण सोडवील ।।(३५२०)

ईश्वराच्या निर्गुण असण्याची चाहूल लागताच त्या निर्गुण असण्यालाच ‘आम्हा येथे कोण सोडवील?’ असा प्रश्न तुकोबा विचारतात. त्यांच्या अभंगांमधली ही वैचारिक स्पष्टता, आर्तता आणि काव्यात्मकता हृदयाचा ठाव घेणारी आहे...

भक्तीचा इतका आकांत करूनही देव असण्याचा काहीच अनुभव येत नाही.. प्रत्यक्ष भेट तर दूरच. याची खंत करता करता तुकोबांना प्रश्न पडू लागला की ज्या सगुण रूपातल्या विठ्ठलाला आपण आळवतो आहे तसा खरोखरचा विठ्ठल म्हणून कोणी नाहीच की काय? पूर्वसूरींनी सांगितलेल्या ईश्वराच्या निर्गुण-निराकारपणाची आतून जाणीव होणारा हा टप्पा तुकोबांना अधिक अंतर्मुख करणारा होता.

(१६.२.२०२०)

***

## ६) तोवरी म्या त्यास कैसे निषेधावे..

'तुका म्हणे काय जालासी निर्गुण । आम्हा येथे कोण सोडवील ।।' असा प्रश्न तुकोबांना पडतो आहे. पण निर्गुणाची अशी नुसती चाहूल लागली म्हणून केवळ मी सगुणाचा त्याग कसा करावा? असंही त्यांना वाटतं आहे. एका अभंगात ते म्हणतात-

तोवरी म्या त्यास कैसे निषेधावे । जो नाही बरवे कळो आले ।।
कोणाचिया मुखा तंट* नाही मागे । वचन वाउगे बोलो नये ।।
दिसे हानी परी निरास न घडे । हे तंव रोकडे अनुभव ।।
आपुलिया भोगे होईल उशीर । तोवरी का धीर केला नाही ।।
तुका म्हणे गोड करील सेवट । पाहिली ते वाट ठायी आहे ।। (१९५५)

तंट* - बोभाटा / तफावत / प्रतारणा

निर्गुण निराकार म्हणजे काय? त्याची प्रत्यक्ष अनुभूती आल्याशिवाय मी माझ्या विठ्ठलाचा निषेध कसा करू? असा अत्यंत सहज आणि प्रामाणिक प्रश्न तुकोबांना पडतो. मग ते स्वतःला समजावतात की कुणाचं तरी ऐकून निष्कर्ष काढत वावगं बोलू नये. आपल्या मार्गानं गेलं तर उशीर होईल खरा पण तोवर धीर धरावा...'

या अस्थिर अवस्थेतही तार्किकांचा टाका संग... (२४६१) या आपल्या भूमिकेशी ते ठाम राहतात. 'सत्य असत्याशी मन केले ग्वाही' असं म्हणून प्रत्येक द्विधा अवस्थेत आपल्या मनाचीच साक्ष खरी मानतात. डोंगरावर एकांतात वृक्षवल्लींच्या सान्निध्यात मनाला पडलेल्या प्रश्नावर 'तुका म्हणे होय मनासी संवाद । आपुलाची वाद आपणासी ।।' (२४८१)... या भूमिकेतून चिंतन करत राहतात.

सगुण-निर्गुणाचा छडा लागेपर्यंत हा वाद चालूच राहिला. सतत हाच एक प्रश्न त्यांना छळत राहिला. या तीव्र आंतरिक संघर्षाचं वर्णन एका अभंगात आहे- रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन ।। (४०९१)

तुकोबांची सगुण रूपाच्या दर्शनाची उत्कट ओढ कुणाही भक्ताला साजेशी आहे. पण या टप्प्यावरचा त्यांचा निर्गुणाच्याही प्रचितीचा युद्धपातळीवरचा आग्रह फार वेगळा आहे. तो समजून घेताना आत्मप्रचितीशीच प्रामाणिक राहण्याच्या त्यांच्या वृत्तीपुढे नतमस्तक व्हावंसं वाटतं..!

(२३.२.२०२०)

***

## ७) करावा अभ्यास विठ्ठलाचा...

भक्ती-संघर्षाच्या आंतरिक प्रवासात भावनिक पातळीवरचा आकांत ओलांडून तुकोबांच्या ईश्वरभेटीच्या ध्यासानं एक नवं वळण घेतलं. 'तोवरी म्या त्यास कैसे निषेधावे । जो नाही बरवे कळो आले।।' असा अत्यंत प्रामाणिक आत्मसंवाद आणि युद्धपातळीवरच्या आंतरिक संघर्षाचं पर्यवसन रीतसर 'अभ्यास' करण्यात झालं. एका अभंगात ते स्वतःलाच सांगतात-

न लगती कष्ट न लगे सायास । करावा अभ्यास विठ्ठलाचा ।। (३९०५)

या अभ्यासाची सुरुवात ते विठ्ठल आणि आपला संबंध तपासण्यापासून करतात. हा संबंध जाणल्यावर त्याचा अभ्यास करणं सोपं जाईल म्हणून. काय आहे हा संबंध? एका अभंगात म्हटलंय-

मौन का धरिले विश्वाच्या जीवना । उत्तर वचना देईं माझ्या ।।
तू माझे संचित तू चि पूर्वपुण्य । तू माझे प्राचीन पांडुरंगा ।।
तू माझे सत्कर्म तू माझा स्वधर्म । तू चि नित्यनेम नरायणा ।।
कृपावचनाची वाट पाहतसे । करुणा वोरसे बोल काही ।।
तुका म्हणे प्रेमळाच्या प्रियोत्तमा । बोल सर्वोत्तमा मजसवे ।। (४२२८)

'..... तू माझे प्राचीन पांडुरंगा...' या रचनेतून आशय आणि अभिव्यक्ती दोन्ही पातळ्यांवर किती श्रेष्ठ काव्याची प्रचिती येतेय..! तुकोबा स्वतःला पांडुरंगाचे वंशज मानतायत. तूच माझे संचित, पूर्वपुण्य, माझे सत्कर्म, स्वधर्म, नित्यनेम.. सर्व तूच आहेस असं म्हणत एकप्रकारे विठोबारूपातल्या स्वतःलाच आवाहन करतायत... निर्गुणाचं बोट धरून स्वरूपाकडे वाटचाल सुरू झालीय..!

'असाध्य ते साध्य करिता सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ।।' या निष्ठेने 'तुकोबा ते विठोबा' या प्रवासातले सुरुवातीचे थांबे पार करून तुकोबा आता मुक्कामाच्या दिशेला निघाले आहेत...

(०१.०३.२०२०)

***

## ८) गाऊ वानू तुज विठो तुझा करू अनुवाद..

'करावा अभ्यास विठ्ठलाचा' अशी आंतरिक निकड जाणवल्यावर अधिक खोलात शिरून परोपरीनं विठ्ठलाचा अभ्यास सुरू झाला. एका अभंगात तुकोबा म्हणतात-

गाऊ वानू तुज विठो तुझा करू अनुवाद । जिकडे पाहे तिकडे सर्वमय गोविंद ।।
आनंद रे विठोबा जाला माझे मनी । देखिले लोचनी विटेसहित पाउले ।।
न करी तपसाधने रे मुक्तीचे सायास । हा चि जन्मोजन्मी गोड भक्तीचा रस।।
तुका म्हणे आम्हा प्रेमा उणे ते काई । पंढरीचा राणा साठविला हृदयी ।। (१५८४)

अनुवाद म्हणजे काय असतं? एका भाषेत व्यक्त झालेला आशय दुसऱ्या भषेतून व्यक्त करायचा. त्यासाठी एका भाषेचा व्यूह भेदत आत शिरायचं, आतला आशय जिंकून घेऊन सहीसलामत बाहेर पडायचं आणि या कमावलेल्या आशयासाठी, तो व्यक्त करण्यासाठी रचायचा दुसऱ्या भाषेचा व्यूह. या अभंगात तुकोबा म्हणतायत, गाऊ वानू तुज विठो तुझा करू अनुवाद...!' विठ्ठलाचा अनुवाद कसा करणार? काय असेल ही अद्‌भुत प्रक्रिया? सगुण साकार भाषेतल्या विठ्ठलनामाचा निर्गुण निराकाराच्या भाषेत अनुवाद करायचा असं असेल का?... त्याचं नाम आळवत, त्याचं परोपरीनं वर्णन करत सगुणाचा व्यूह भेदून झालाय... जिकडे पाहे तिकडे सर्वमय झालेला गोविंद, पंढरीचा राणा हृदयी साठविलाय... आता ते आत्मसात केलेलं सत्‌तत्त्व निर्गुणाच्या भाषेत गुंफायचं..! विठ्ठलाचा अनुवाद म्हणजे असं असेल का? तसंच असेल. कारण आणखी एका अभंगात म्हटलंय,

आहे ऐसा देव वदवावी वाणी । नाही ऐसा मनी अनुभवावा ।।
आवडी आवडी कळिवराकळीवरी । वरिली अंतरी ताळी* पडे ।।
अपूर्व दर्शन मातेपुत्रा भेटी । रडू मागे तुटी हर्षयोगे ।।
तुका म्हणे एके कळते दुसरे । बरियाचे बरे आहाचेच आहाच** ।।'(४२२६)

*ताळी = देहसत्यत्व, **आहाच = वरवर

यातला अनुभवावा हा शब्द महत्त्वाचा आहे. 'जाणावा' असं म्हटलेलं नाही. अनुभवण्यात अधिक आंतरिकता आहे. प्रत्यक्षता आहे. केवळ बुद्धीनं जाणणं नाही... देव आहे, तो असा आहे, तसा आहे... असं म्हणत राहावं. भक्तीमार्ग अनुसरावा. पण प्रत्यक्षात तो तसा नाही. त्याचं निर्गुण निराकारत्व, नसणं मनाने अनुभवावं... जसं रोजच्या लौकिक जगण्यात हरप्रकारे आपण देहभावात गुंतलेले असतो. ते प्रत्यक्ष अनुभवत असतो. तेच कळतं, खरं वाटतं. पण हे सर्व वरवरचं असतं, तात्पुरतं असतं हे समजून घ्यायला हवं हे तुकोबांच्या लक्षात आलं..! अत्यंतिक खरेपणानं हे आतून उमगणं सोपं नाही... पण त्यांनीच म्हणून ठेवलंय- 'असाध्य ते साध्य करिता सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ।।'

(८.३.२०२०)

***

## ९) माझे लेखी देव मेला..

देव भेटत नाही, बोलत नाही म्हटल्यावर, त्याच्या नसण्याची चाहूल लागल्यावर तुकोबा या नसण्याचा, निर्गुण-निराकाराचा अभ्यास करतात. ते आत्मसात करायचा प्रयत्न करतात. देवाच्या प्रत्यक्ष भेटीचा हट्ट सोडून देतात. ईश्वराच्या 'निर्गुण-निराकार' असण्याबद्दल मागे कुणी कुणी सांगितलं होतं ते खरंच आहे हे त्यांना कळून चुकलं. एका अभंगात ते म्हणतात-

लटिका तू मागे बहुतांसी ठावा । आले अनुभवा माझ्या तेही ।।' (२२४८)

दुसऱ्या एका अभंगात म्हटलंय-

आता मजसाटी याल आकारास । रोकडी हे आस नाही देवा (२९३०)

ही खूणगाठ पक्की झाल्यावर मगच तुकोबा निःशंकपणे जाहीर करतात-

माझे लेखी देव मेला । असो त्याला असेल ।।
गोष्टी न करी नाव न घे । गेलो दोघे खंडोनी ।।
स्तुतिसमवेत निंदा । केला धंदा उदंड ।।
तुका म्हणे निवांत ठेलो । वेचित आलो जीवित्व' (२३४९)

केवळ तर्कबुद्धीनं नाही किंवा ऐकीव ज्ञानावर विसंबून नाही तर 'अभ्यासा'तून, अनुभवातून देव म्हणून काही नसण्याची प्रचिती घेतल्यावर मगच तुकोबा म्हणतात- 'माझे लेखी देव मेला । असो त्याला असेल'

पण या प्रचितीमुळं देवाचं बोट सुटून ते एकाकी झाले नाहीत. या अनुभूतीत त्यांचा अहंकारही लुप्त झाला. 'तो' नाही आणि 'मी'पणही नाही. दोघेपण खंडून गेलं. मी-तो हे व्दैत संपलं. छोट्या 'मी'पणातून सुटून व्यापक होता आलं. 'तुकोबा ते विठोबा' या प्रवासाची सांगता झाली. आता-

निरंजनी आम्ही बांधियले घर । निराकारी निरंतर राहिलो आम्ही ।।
निराभासी पूर्ण जालो समरस । अखंड ऐक्यास पावलो आम्ही ।।
तुका म्हणे आता नाही अहंकार । जालो तदाकार नित्य शुद्ध ।। (४३२६)

निरंजन = दुर्गुण, दोष नसलेले, निर्गुण ब्रह्म

दुर्गुणांनी भरलेल्या अहंकारातून सुटून निर्गुणाशी समरस झालेल्या ऐक्यामधे आता खंड नाही. निराकारातलं हे स्थिरावणं तात्पुरतं नाही. निरंतरचं आहे. कारण आता तिथेच आम्ही घर बांधलेलं आहे...! 'याचसाठी केला होता अट्टहास...' हे शब्द या कृतकृत्य भावनेतूनच उमटले असतील..!

(१५.३.२०२०)

***

## १०) शून्य निरसूनि राहिले निर्मळ..

सगुण भक्तीच्या, मूर्तीपूजेच्या मार्गानं सुरू झालेला ईश्वराचा शोध निर्गुणात, शून्यात येऊन स्थिरावला. निराकाराचे, 'काही नाही'चे - शून्याचे ज्ञान झाले. तुकोबांनी साक्षात 'अभाव' अनुभवला. पण त्यांनी विठोबाची 'सोय' सोडली नाही... समजून उमजून त्या अभावात भाव भरला..!

काही नसण्याला नाव देणं, त्याला इंद्रियसंवेद्य रंग गंध आकार इ. मितींमधे पाहणं, त्याच्याशी संवाद साधणं... ही क्रिएटिव्हिटी..! नसतेपणाच्या, शून्यत्वाच्या अनुभूतीत हरवून न जाता तिला अशी भावपूर्ण प्रतिक्रिया देणं, यात काव्य आहे. 'वास्तवा'ला प्रतिसाद देण्याची सुंदर शैली आहे ती... परंपरेनं याला ज्ञानोत्तर भक्ती असं म्हटलं आहे. या संदर्भात एका अभंगात तुकोबा म्हणतात-

> अद्वयची द्वय जाले चि कारण । धरिले नारायणे भक्तीसुखे ।।
> अपरोक्ष आकार जाला चतुर्भुज । एकतत्त्व बीज भिन्न नाही ।।
> शून्य निरसूनि राहिले निर्मळ । ते दिसे केवळ विटेवरी ।।
> सुखे घ्यावे नाम वदनी ही चाड । सरिता वापी आड एक पाणी ।।
> तुका म्हणे मीच आहे तेणे सुखे । भेद नाही मुखे नाम गातो ।। (३७४९)

ईश्वरभेटीसाठी आकांत मांडला तरी तो भेटत नव्हता.. बोलत नव्हता... पण भक्ती-संघर्षाच्या आंतरिक प्रवासातील एकेक टप्पे पार करत जेव्हा 'माझे लेखी देव मेला..' असं म्हणता येण्याइतकी शून्यत्वाची प्रचिती आली तेव्हा, त्या नकाराच्या टोकावर तुकोबांना 'शून्य निरसूनि राहिले निर्मळ। ते दिसे केवळ विटेवरी' ही अनुभूती आली..! या अनुभूतीतली उत्कटता नुसता हा एक अभंग वाचून समजण्यासारखी नाही. वेळोवेळी व्यक्त झालेल्या या आकांत-प्रवासातील सर्व भावनिक आंदोलनांशी समरस होऊन गाथा वाचत वाचत या ओळींपाशी आल्यावरच त्यातली अपूर्वता जाणवू शकेल.

(गाथा-वाचनाच्या प्रयत्नात मी हळूहळू रमत.. गुंतत गेले होते तेव्हा या ओळी वाचताना तुकोबांच्या अनुभूतीतील उत्कटता जाणवून मला गहिवरून आलं आणि पाणावलेल्या बंद डोळ्यांसमोर या ओळींमधलं 'ते दृश्य' तरळलं होतं... गाथा-वाचनाच्या प्रयत्नातला हा सार्थकाचा टप्पा आहे असं वाटलं होतं. त्यामुळं या ओळी माझ्यासाठी संस्मरणीय झाल्या आहेत.)

(२२.३.२०२०)

***

## ११) तुका म्हणे आता उरलो उपकारापुरता..

संत तुकारामांच्या भक्ती-संघर्षाचा आंतरिक प्रवास कसा झाला असेल त्याचा निर्देश करणाऱ्या काही अभंगाची निवड गाथा वाचताना मला जाणवलं त्यानुसार आपल्यापुरती मी केलेली आहे. त्यांचा मी लावत असलेला अन्वयार्थ म्हणजेही पूर्णतः माझं 'वाटणं' आहे. या पेक्षा वेगळी निवड कुणी करू शकेल.. अन्वयार्थही वेगळा लावता येऊ शकेल. गेले काही आठवडे मला जे जसं जाणवलं ते विचारार्थ इथे शेअर केलं. आज त्याची सांगता-

ईश्वरभेटीसाठी आकांत मांडणाऱ्या आंतरिक संघर्षाला तोंड देत 'तुकोबा ते विठोबा' हा खडतर प्रवास संपला. जे हवं होतं ते मिळालं. जिथं पोचायचं होतं तिथं पोचता आलं... घट बनवण्यासाठी कुंभार चाकाला गती देतो. हळूहळू आकार घेत घट तयार होतो. पूर्ण झाल्यावर घट चाकावरून काढून घेतला तरी गती दिलेलं चाक फिरतच राहातं. तसं ईश्वरभेटीचं इप्सित साध्य झालं तरी देह आहे तोपर्यंत जगणं उरतंच. पण ते केवळ उपकारापुरतं..! या कृतकृत्य भावनेची नोंद असलेला तुकोबांचा एक महत्त्वाचा अभंग सर्वश्रुत आहे. तो असा-

अणुरणीया थोकडा तुका आकाशाएवढा । गिळुनी सांडिले कळिवर । भव, भ्रमाचा आकार ।
सांडिली त्रिपुटी । दीप उजळला घटी । तुका म्हणे आता उरलो उपकारापुरता ।। (९९३)

'गिळुनी सांडिले कळिवर । भव, भ्रमाचा आकार' या सहा शब्दात व्दैताकडून अव्दैताकडे झालेला प्रवास सांगितला आहे. ज्ञानप्राप्तीसाठी शरीर धारण करावे लागते. त्याचे भोग भोगावे लागतात. ज्ञानप्राप्ती झाल्यावर उमगते की हा देह, हा संसार अनित्य आहे. दिसतात ते सर्व केवळ भ्रमाचे आकार आहेत. हे आतून समजले की शरीर म्हणजे मी ही धारणा सोडणे शक्य होते. देहभावात असणे हे व्दैत आणि देहभावातून मुक्त होणे हे अव्दैत..! हे ज्ञान झाले. इतके खोलवर की ज्ञेय-ज्ञाता-ज्ञान ही त्रिपुटीही उरली नाही. त्यांचं वेगवेगळेपण निमालं. देहाच्या घटात आत्मज्ञानाचा दीप उजळला. तुकोबांच्या 'अणुरेणूहूनही' छोट्या 'मी'ला आकाशाएवढं विस्तारलेलं स्व-रूप दिसलं..! आता देह इथं वावरला तरी तो केवळ जगण्याचा उपचार म्हणून. या अवस्थेला 'उरलो उपकारापुरता' म्हणणारा हा काव्यात्म अभंग विलक्षण सौंदर्यानुभूती देणारा आहे...!

(२९.३.२०२०)

***

(२००६ साली करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर येथे वि. स. खांडेकर स्मृती व्याख्यानमालेत केलेल्या भाषणासाठी मी ‘कवितेतील ईश्वर’ हा विषय घेतला होता. अनेक कवितांची उदाहरणं देत कविता हे ईश्वरशोधाचं समर्थ माध्यम कसं होऊ शकतं त्याची मांडणी करण्याचा प्रयत्न मी केला होता. या भाषणाच्या शेवटी संत तुकाराम महाराजांनी आपल्या ‘कविते’तून हा शोध कसा घेतला ते विस्ताराने मांडले होते. गेले काही आठवडे त्यातलेच अभंग अधिक स्पष्टीकरणासह इथं शेअर केले. ते भाषण लेख स्वरूपात ‘कवितेभोवतीचं अवकाश’ या माझ्या लेखसंग्रहात समाविष्ट केलेले आहे.)

***

# चांगदेवपासष्टी : एक आकलन

चांगदेवपासष्टी : एक आकलन

# प्रास्ताविक

काही वर्षांपूर्वी एका मैत्रिणीनं मला 'चांगदेवपासष्टी' विषयी विचारलं. तेव्हा मला त्या संदर्भातल्या आख्यायिकेशिवाय काहीच माहिती नव्हतं. तिनं विचारल्यामुळे मलाही या विषयाची उत्सुकता वाटली म्हणून मी पासष्ठ ओव्यांचे ते छोटेसे पुस्तक मिळवले आणि ओव्या समजून घ्यायचा प्रयत्न करू लागले. या प्रक्रियेत कुणीकुणी यावर केलेल्या भाष्यांचा मला उपयोग झाला. या आकलन-प्रक्रियेचा भाग म्हणून मग मी त्या ओव्यांचे आजच्या मराठीत पद्यरूपांतर करू लागले.

रूपांतर प्रक्रिया आपल्याला मूळ संहितेच्या आशयाच्या गल्ली-बोळातून फिरवून आणते आणि त्यातले सर्व बारकावे लक्षात आणून देते असा माझा अनुभव आहे. तेव्हा केलेलं चांगदेवपासष्टीचं पद्य-रूपांतर मूळ ओवीसह दर रविवारच्या सुप्रभाती शेअर करण्याचा विचार आहे. आवश्यकतेनुसार रूपांतरित ओवीला पूरक असं थोडं स्पष्टीकरणही देण्याचा प्रयत्न करीन.

***

## भाग १

संत ज्ञानेश्वरांनी श्री चांगदेवांना उद्देशून लिहिलेले पासष्ट ओव्यांचे पत्र म्हणजे चांगदेवपासष्टी. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ म्हणजे गीतेचा अर्थ-विस्तार आहे तर चांगदेवपासष्टी म्हणजे अद्वैत तत्त्वज्ञानाचे स्वतः अनुभवून केलेले प्रतिपादन असलेल्या 'अमृतानुभव' या ग्रंथाचा अर्करूप सारांश आहे..! यात केवळ पासष्ट ओव्यांमधून वेगवेगळ्या उपमांच्या आधारे 'जे जे आहे' ते सर्व एकाच तत्त्वाचा विस्तार आहे हे 'वास्तव' परोपरीने समजावून सांगितले आहे.

स्वस्ति श्री वटेशु । जो लपोनी जगदाभासु
दावी मग ग्रासु । प्रगटला करी ।।१।।

*

स्वस्ति श्री वटेश, जो दावी सर्वांस
जगताचा भास लपूनिया ।
तोच मग स्वये करून निरास
आत्मस्वरूपास प्रकटवी ।।१।।

**

हे श्री वटेशु, स्वस्ति म्हणजे 'कल्याण असो' अशी सुरुवात करून ज्ञानेश्वर चांगदेवांना उद्देशून अव्दैत तत्त्वज्ञान समजावून सांगत आहेत. वटेश्वराचा पुत्र म्हणून वटेश. हे चांगदेवांचे नाव आहे.

हे चांगदेवा तू स्वयंसिद्ध, आत्मस्वरूप आहेस. याविषयीचे ज्ञान जेव्हा लपलेले, झाकलेले राहते तेव्हा हे विश्व अनेक आकारांमधे प्रकटलेले दिसते आणि जेव्हा हे ज्ञान जाणिवेत प्रकटते, तेव्हा या सतत बदलणाऱ्या अनेकत्वाचे तात्पुरतेपण जाणवून अनेकत्वाचा जणू निरास होतो.

५.४.२०२०

***

## भाग २

पहिल्या ओवीतील विश्वाच्या मूलतत्त्वाविषयीचे ज्ञान जेव्हा झाकलेले राहते तेव्हा हे विश्व अनेक आकारांमधे प्रकटलेले दिसते आणि जेव्हा हे ज्ञान जाणिवेत प्रकटते, तेव्हा या सतत बदलणाऱ्या अनेकत्वाचा जणू निरास होतो. हाच आशय पुढील दुसऱ्या, तिसऱ्या ओव्यांमधे अधिक स्पष्ट केला आहे. आणि चौथ्या, पाचव्या ओव्यांमधे 'सोन्याचे अलंकार', 'कल्लोळ-कंचुकी' या उपमा देऊन त्याचे स्पष्टीकरण केलेले आहे.

प्रगटे तंव तंव न दिसे । लपे तंव तंव आभासे
प्रगट ना लपाला असे । न खोमता जो ।।२।।

*

प्रकटता तत्त्व जग दिसेनासे
पुन्हा दिसलेसे लपे तेव्हा ।
प्रकट ना लुप्त उणे न अधिक
ते *निरुपाधिक असे सदा ।।२।।

**

*निरुपाधिक म्हणजे ज्याला स्पर्श..रूप..गंध.. असे कोणतेही इंद्रियसंवेद्य आयाम नाहीत असे.

बहु जंव जंव होये । तंव तंव कांहीच न होये
काहीं नहोनिं आहे । अवघाचि जो ।।३।।

*

अनेक रूपात प्रकटत राही
तरी नवे काही झाले काय? ।
राही अबाधित रूपे लेऊनही
न होऊन काही तेची सर्व ।।३।।

**

सोनें सोनेंपणा उणें । न येताची झालें लेणें ।
तेंवी न वेंचतां जग होणें । अंगे जया ।।४।।

*

काहीच न होते सोन्यामध्ये उणे
जरी होय लेणे सोनेच ते ।
तैसे जग होणे न होता विकार
दिसे निराकार आकारात ।।४।।

**

कल्लोळकंचुक । न फेडिता उघडें उदक ।
तेंवी जगेंशी सम्यक। स्वरूप जो ।।५।।

*

कल्लोळांची वस्त्रे अंगी लेऊनही
उघडे प्रवाही वाहे पाणी ।
तसे नाम-रूप करून धारण
राहते आपण स्वरूपात ।।५।।

**

९.४.२०२०

***

## भाग ३

पुढील ओव्यांमधेही, विश्वरूपात 'जे जे काही आहे' ते सर्व एकाच तत्त्वाचा विस्तार आहे हे सत्य स्वरूपाचे ज्ञान विविध उपमांच्या आधारे परोपरीने समजावून सांगितले आहे.

परमाणूंचिया *मांदिया । पृथ्वीपणें *न वचेचि वायां ।
तेंवी विश्वस्फूर्ति इयां । झांकवेना जो ।।६।।

✻

*मांदिया म्हणजे समुदाय, *'न वचेची वाया' - वाया म्हणजे उगीचच. न वचेची म्हणजे ढळत नाही.

कती परमाणू पृथ्वितत्त्व एक
रूपात अनेक लपते ना ।
तशी विश्वस्फूर्ती प्रकाशते जरी
झाकते ना तरी आत्मतत्त्व ।।६।।

✻✻

कळांचेनि पांघुरणे । चंद्रमा हरपों नेणें ।
कां वन्ही दीपपणे । आन नोहे ।।७।।

✻

चंद्र हरवेना चंद्रकलांमुळे ।
अग्नी दिव्यामुळे वेगळा ना ।।७।।

✻✻

म्हणोनि अविद्यानिमित्तें । दृश्य द्रष्ट्त्व वर्ते ।
✻तें मी नेणें आईतें । ऐसेंचि असे ।।८।।

✻

दृश्य आणि द्रष्टा असती वेगळे
अज्ञानाच्या मुळे वाटतसे ।
असो अशी मते ते मी काही नेणे
एकत्वच जाणे आयते जे ।।८।।

✻✻

'तें मी नेणें' म्हणजे ते मी काही जाणत नाही, किंवा ते मला मान्य नाही. अमृतानुभव या ग्रंथात 'अज्ञानखंडन' आणि 'ज्ञानखंडन' असे दोन अध्याय आहेत. त्यात ज्ञानेश्वरांनी एकत्व, अव्दैत हे स्वाभाविकपणे आहेच, ज्ञान-अज्ञान दोन्ही सापेक्ष आहे असे म्हटले आहे. या विषयीच्या ज्ञानाच्या अनुभवात ज्ञेय-ज्ञाता-ज्ञान ही ज्ञान-प्रक्रियेतील अंगे मिटून जातात. या अनुभवाप्रत पोचलेल्या ज्ञानदेवाना ही सापेक्षता जाणवते. त्यामुळे विश्वाचे अनेकत्व अज्ञानामुळे 'जाणवते' असं म्हटलं जातं ते मी काही जाणत नाही, किंवा ते मला मान्य नाही असं ते म्हणतात.

जेंवी नाममात्र लुगडें । येऱ्हवीं सुतचि तें उघडें ।
कां माती मृद्भांडें । जयापरी ।।९।।

*

वस्त्रे वेगळाली नाममात्र रूप
सूत हे स्वरूप अंतर्बाह्य ।
किंवा घटादिक अनेक दिसती
साऱ्यामधे माती एक असे ।।९।।

**

१२.४.२०२०

***

## भाग ४

विश्वाकारात 'जे जे आहे' ते सर्व भिन्न भिन्न नसून एकाच मूल तत्त्वाचा केवळ 'विलास आहे' हे एकच सत्य पुढील ओव्यांमधेही विविध उपमांच्या आधारे समजावून सांगितले आहे. ढोबळमानाने पाहता एकच गोष्ट परत परत सांगितली आहे असं वाटेल, त्यासाठी दिलेल्या उपमांमधेही पुनरावृत्ती दिसेल. पण बारकाईनं विचार करत समजून घेत गेलं तर प्रत्येक ओवी खोलातील आशायाच्या अधिक जवळ घेऊन जाणारी आहे हे उमगत जाईल...

तेंवी द्रष्टा दृश्य दशे । अतीत दृङ्.मात्र जें असे ।
तेंचि द्रष्टादृश्यमिसें । केवळ होय ।।१०।।

*

तशाच दृश्यादि दशा वेगळाल्या
वाटती निराळ्या ऐक्य जरी ।
दृश्य द्रष्ट्यावीण असे जे अतीत
तेच त्रिपुटीत दृश्यमान ।।१०।।

**

अलंकार येणें नामें । असिजे निखिल हेमें ।
नाना अवयव संभ्रमें । अवयविया जेंवी ।।११।।

*

दागिने हे नाम दागिन्यात सोने
सोनेच दागिने भिन्न भिन्न ।
जशी वेगळाली दिसती इंद्रिये
वसे त्यांच्यारूपे देह एक ।।११।।

**

तेंवी *शिवोनि पृथ्वीवरी । भासती पदार्थांचिया परी ।
प्रकाशे तें एकसरी । संवित्ति हे ।।१२।।

*'शिवोनि पृथ्वीवरी' म्हणजे शिवापासून (शिव तत्त्वापासून) पृथ्वीपर्यंत- निराकार ते आकार, *संवित्ति म्हणजे ज्ञानमात्र आत्मतत्त्व

**

तशा असंख्यात पदार्थांच्या परी
भासतात जरी सर्वठायी ।
आत्मतत्त्व एक सर्वत्र असते
तेच प्रकाशते चहूकडे ।।१२।।

*

नाहीं ते चित्र दाविती । परि असे केवळ भिंती ।
प्रकाशे ते संवित्ति । जगदाकारें ।।१३।।

**

भित्तिचित्रे सारी दाविती, जे नाही
त्यांच्यामागे पाही नित्य भिंत ।
तसे सारे जग जरी प्रकाशते
फक्त विलसते आत्मतत्त्व ।।१३।।

बांधयाचिया मोडी । *बांधा नहोनि गुळाची गोडी ।
तयापरि *जगपरवडी । संवित्ति जाण ।।१४।।

*'बांधा नहोनि..' (ढेपेच्या आकारामुळे गुळाची गोडी) बांधली जात नाही. जगपरवडी' म्हणजे जगरूपातील विविध आकार..

*

ढेपेस असते गुळाचीच गोडी
सत्वास न मोडी आकाराने ।
तसे आत्मतत्त्व जरी प्रकटते
बाधीत न होते रूपांमुळे ।।१४।।

**

घडियेचेनि आकारें । प्रकाशिजे जेंवी अंबरे ।
तेंवी विश्वस्फूर्ति स्फुरें । स्फूर्तिचि हे ।।१५।।

*

घडीच्या रूपाने वस्त्र विलसते
विश्वरूपांमधे स्फूर्ती तशी ।।१५।।

**

१६.४.२०२०

***

## भाग ५

हे विश्व ज्या एका मूलतत्त्वाचा विस्तार आहे त्या मूलतत्त्वाच्या स्वरूपाविषयी पुढील ओव्यांमधे सांगितले आहे. हे समजावताना समर्पक उपमाही येतात. उपमा म्हणजे केवळ कल्पनाविलास किंवा भाषासौंदर्य नाही. उपमांमधे आशयातील बारकावे उलगडून दाखवण्याचं सामर्थ्य असतं. एरव्ही रुक्ष आणि जड वाटणारा विषय ज्ञानेश्वरांच्या चपखल उपमांमुळे सुंदर आणि आनंददायी होऊन जातो. या दृष्टीने अठरावी ओवी अनुभवण्यासारखी आहे.

न लिंपतां सुखदुःख । येणे आकारें *क्षोभोनि नावेक ।
होय आपणिया सन्मुख । आपणचि जो ।।१६।।

*क्षोभोनि नावेक म्हणजे क्षणमात्र होणाऱ्या स्फुरणाने.. (दृश्य निर्माण करून तो परमात्मा आपणच आपल्या सन्मुख होतो. मात्र या निर्मितीबरोबर उत्पन्न होणाऱ्या सुख-दुःखामधे तो लिप्त होत नाही.)

✻

जरी आकारात  होई भासमान
सुख-दुःखापार राहतसे ।
अलिप्तपणाने होऊन अनेक
आपणासन्मुख राही सदा ।।१६।।

✻✻

तया नांव दृश्याचें होणें । *संवित्ति द्रष्टत्वा आणिजे तेणें ।
बिंबा बिंबत्व जालेपणें । प्रतिबिंबाचेनि ।।१७।।

*संवित्ति म्हणजे ज्ञानमात्र आत्मतत्त्व

तया नाव दृश्य  द्रष्टत्व जे देते
तरी एकत्व ते  नित्य असे ।
प्रतिबिंबामुळे  बिंबाला मिळते
बिंबत्व, जरी ते  एकलेच ।।१७।।

✻✻

तेंवी आपणचि आपुला पोटी । आपणया दृश्य दावित उठी ।
द्रष्टादृश्यदर्शन त्रिपुटी । मांडे तें हे ।।१८।।

✻

हे समजाऊन सांगणे किती चित्रदर्शी आहे पाहा-

तसे आपणची  द्रष्टा होऊनिया
आपल्याच दृश्या पाहते ते ।
निर्मुनिया दृश्य, द्रष्टत्व, दर्शन
त्रिपुटी मांडून खेळतसे ।।१८।।

✻✻

सुताचिये गुंजे । आंतबाहेर नाही दुजें ।
तेंवी तिनपणेंविण जाणिजे । त्रिपुटि हे ।।१९।।

✻

सुताच्या लडीत अंतर्बाह्य सूत
तसे त्रिपुटीत 'ते'च असे ।
तीनपणाविना आपण आपले
राहते एकले आपल्यात ।।१९।।

✻✻

नुसधें मुख जैसे। देखिजतसें दर्पणमिसें ।
वायांचि देखणें ऐसें । गमों लागे ।।२०।।

✻

आपलेच मुख दर्पणी दिसते
द्रष्टत्व लटिके नाही काय? ।।२०।।

✻✻

१९.४.२०२०

✻✻✻

## भाग ६

मूलतत्त्व एकमेव आहे आणि तेच मी आहे.. सोहं अस्मि.. याची प्रचिती येणे तो अमृतानुभव..! ज्ञानेश्वर चांगदेवांना वेगवेगळ्या दर्शनबिंदूतून या अमृतानुभवाचे दर्शन घडवत आहेत...

तैसें न वचतां भेदा । संवित्ति गमे त्रिधा ।
हेंचि जाणे *प्रसिद्धा । उपपत्ति इया ।।२१।।

*'प्रसिद्धा' हे चांगदेवाना उद्देशून वापरलेले संबोधन आहे.

*

तसे आत्मतत्त्व अभेदी राहते
तरी ते वाटते तीनपणे ।
भेदातीत तत्त्व जाणण्याची युक्ती
सांगे उपपत्ती जाण ती तू ।।२१।।

**

दृश्याचा जो उभारा । तेंचि द्रष्ट्टत्व होय संसारा ।
या दोहींमाजिला अंतरा । दृष्टी पंगु होय ।।२२।।

*

दृश्याचा पसारा  त्यामुळे द्रष्टत्व
दोहोमुळे जग  चालतसे ।
पण दोन्हीमधे  अंतर पाहता
दृष्टीला पंगुता येऊ लागे ।।२२।।

**

दृश्य जेधवां नाहीं । तेधवां दृष्टि घेऊनि असे काई ? ।
आणि दृश्येंविण कांही । द्रष्टत्व असे ? ।।२३।।

*

दृश्य नसे जर पाहणे ते काय?
द्रष्टत्वही जाय दृश्यामागे ।।२३।।

**

म्हणोनि दृश्याचें जालेपणें । दृष्टि द्रष्ट्टत्व होणें ।
पुढती तें गेलिया जाणें । तैसेचि दोन्ही ।।२४।।

*

दृश्य असे तर द्रष्टत्व असेल
जर ते नसेल राहे काय? ।।२४।।

**

एवं एकचि झालीं *ती होती । तिन्ही गेलिया एकचि व्यक्ती ।
तरी तिन्ही भ्रांति । एकपण साच ।।२५।।

*ती म्हणजे तीन असा अर्थ घेतला आहे.

*

एकातून तीन तिन्ही जाता एक
साच एकपण तीन भ्रांती ।।२५।।

**

टीप- हे पद्यरूपांतर मी बरेच वर्षांपूर्वी केलेले आहे. या उपक्रमाच्या निमित्ताने माझाही त्यावर पुनर्विचार होतो आहे. कुणी काही प्रश्न विचारले तर त्या दृष्टीने आणखी चिंतन होतेय. पद्यरूपांतरात काही किरकोळ बदल करायला हवेत, काही ठिकाणी विस्तार हवा असे जाणवतेय. प्रत्येक वाचनात ते केलेही जातायत. तुम्हालाही काही सुचवावेसे वाटले तर अवश्य सुचवावे... ही एक न संपणारी आकलन-प्रक्रिया आहे.

२३.४.२०२०

***

## भाग ७

मागील ओव्यांमधे आत्मस्वरूपाच्या नित्य, अविचल स्थितीचे वर्णन केल्यावर आता पुढील ओव्यांमधे उपमा देऊन त्याचे स्पष्टीकरण केले आहे...

दर्पणाच्या आधि शेखीं* । मुख असतचि असे मुखीं ।
माजीं दर्पण अवलोकीं । आन कांहीं होय ? ।।२६।।

*शेखीं म्हणजे शेवटी.. आरशात पाहण्याआधी आणि नंतर मुखाच्या जागी मुख असतेच. आणि आरशात पाहतानाही ते वेगळे होते का? तर नाही. ते तसेच असते...

*

आरसा समोर  असेल नसेल
मुखाजागी मुख  असते ना?
पाहता त्याच्यात  दिसे प्रतिबिंब
मुळातले बिंब  बदले का?।।२६।।

**

हीच उपमा पुढे अधिक स्पष्ट केली आहे-

पुढें देखिजे तेणें बगें*। देखतें ऐसें गमों लागे ।
परी दृष्टीतें वाउगें । झकवित असे ।।२७।।

आरशात समोर प्रतिबंब दिसते तेव्हा, *तेणें बगें म्हणजे त्या पाहण्यामुळे आपण 'देखते' म्हणजे पाहणारा, द्रष्टा आहोत असे वाटू लागते... प्रतिबिंबामुळे निर्माण होणारा दृश्य, द्रष्टा हा आभास दृष्टीला उगीचच (वाउगे) भुलवत (झकवत) असतो.

*

समोर दिसता प्रतिबिंब साच
पाहतो असेच वाटू लागे ।
पाहणारा पाही आभास दृश्याचा
दृष्टीला फुकाचा चकवाच ।।२७।।

**

म्हणोनि दृश्याचिये वेळे । दृश्यद्रष्टत्वावेगळें ।
वस्तुमात्र निहाळे* । आपणापाशीं ।।२८।।

*

*निहाळे - न्याहाळणे. या विश्व पसाऱ्याच्या 'दृश्या'कडे पाहताना हे जाणून घ्यावे की या सगळ्याच्या मुळाशी असलेलं आत्मतत्त्वच दृश्य, द्रष्टा होऊन आपल्यालाच न्याहाळात आहे.

म्हणून जाणावे दृश्याचिये वेळे
दर्शन निराळे काय आहे?
स्वतः आत्मतत्त्व दृश्य, द्रष्टा होते
आपण पाहते आपणाला ।।२८।।

**

वाद्यजातेंविण ध्वनी । काष्ठजातेंविण वन्ही ।
तैसें विशेष ग्रासुनी । स्वयेंचि असे ।।२९।।

वाद्यांमुळे ध्वनीचे अस्तित्व विशेषत्वाने जाणवते, लाकूड जळते तेव्हा अग्नी समोर दिसतो पण वाद्ये नसतील तेव्हाही ध्वनी असतोच, लाकूड पेटलेले नसेल तेव्हाही अग्नी असतोच त्याप्रमाणे दृश्यामुळे विशेषत्वाने जग दिसत असले तरी त्या पलिकडे आत्मतत्त्व हे स्वयंभूपणे असतेच.

*

वाद्ये नसताही असतोच ध्वनी
असतोच वन्ही काष्ठावीण ।
तसेच विश्वाच्या दर्शनापल्याड
आत्मतत्त्व एक असतेच ।।२९।।

**

जें म्हणतां नये कांहीं । जाणो नये कैसेंही ।
असतचि असे पाही । असणें जया ।।३०।।

त्याचे शब्दात वर्णन करता येत नाही. ते कशाहीमुळे जाणता येत नाही. तरी ते आत्मतत्त्व 'आहे'. त्याला 'असणे' ही एकच मिती आहे.

‘असणे’ शब्दात वर्णताच न ये
जाणताही न ये कशानेही ।
अनिर्वचनीय असे ते ‘असणे’
जरी अज्ञेय ते ‘असे’ नित्य ।।३०।।

**

२६.४.२०२०

***

## भाग ८

आपुलिया बुबुळा । दृष्टि असोनि *अखम डोळा ।
तैसा आत्मज्ञानीं दुबळा । ज्ञानरूप जो ।।३१।।

*अखम म्हणजे अक्षम

डोळ्यांमधे दृष्टी  असते तरीही
डोळा तिला काही दिसेल का?
ज्ञानी ज्ञानरूप  तसाच दुबळा
ज्ञेय तो स्वतःला  होईल का?।।३१।।

**

याचे अधिक स्पष्टीकरण पुढील ओवीत केलेले आहे.

जें जाणणेंचि कीं ठाईं । नेणणें कीर नाहीं ।
परी जाणणें म्हणोनियांही । जाणणें कैंचे ! ।।३२।।

आत्मतत्त्व, ठाईं म्हणजे जागीच- स्वतःत 'जाणणे'च आहे, म्हणजे ज्ञानस्वरूपच आहे. तिथे नेणणे', न जाणणे' (कीर) खरोखर नसतेच. पण जाणणे तरी वेगळेपणाने कसे असेल?

*

संपूर्ण असणे  केवळ जाणीव
नाहीच नेणीव खरोखर ।
ज्ञान-स्वरूपात वेगळेपणाने
जाणाया जाणणे असेल का?।।३२।।

**

यालागीं मौनेंचि बोलिजे । कांही नहोनि सर्व होईजे ।
नव्हतां लाहिजे । कांहींच नाहीं ।।३३।।

ज्ञानदेव चांगदेवाना उपदेश करतायत- म्हणून आत्मतत्त्वाविषयी शब्दात काही सांगायला जाऊ नये. मौनानेच बोलावे. प्रत्येकातील आत्मतत्त्व हे इंद्रियादी देहरूप, किंवा जीव यापैकी काहीच नसतं. पण आत्मतत्त्व असतं म्हणून हे सर्व असतं. हे जाणून आपण देहभावापलिकडील आत्मतत्त्वाशी समरस होऊन 'काहीच नाही' अशी निर्विशेष अवस्था अनुभवावी

*

म्हणून मौनात  राहून बोलावे
न होऊन व्हावे  सर्व काही ।
न होता विशेष  आपुल्याच ठायी
प्राप्त कर काही निर्विशेष ।।३३।।

✻✻

नाना बोधाचिये सोयरिके । साचपण जेणें एके ।
नाना कल्लोळमाळिके । पाणी जेंवि ।।३४।।

मागच्या ओवीतलाच आशय इथे उपमा देऊन स्पष्ट केला आहे. पाठोपाठ येणाऱ्या लाटांना कल्लोळमाळिका म्हणणं किती सार्थ आणि सुंदर आहे ना..!

✻

असंख्य कल्लोळ त्यात पाणी एक
होऊन अनेक वाहतसे ।
तशा उपपत्ती अनेक बोधांच्या
ज्ञान एक त्याच्या पार आहे ।।३४।।

✻✻

जें देखिजतेविण । एकलें देखतेंपण ।
हें असो आपणीया आपण । आपणचि जें ।।३५।।

देखिजतेविण म्हणजे दृश्यविश्वावीण, देखतेपण म्हणजे पाहणे- द्रष्टेपण एकटेच असते. आपण आपले आपल्यात असते..!

✻

पाहणे एकले दृश्य-विश्वावीण
आपले आपण आपणात ।
दृश्य ना दर्शन कोठे द्रष्टेपण
त्रिपुटीची खूण लोपलेली ।।३५।।

✻✻

हे लिहिताना मनात आलं की स्वप्न हा प्रत्येकाचा अनुभव आहे. स्वप्नात विविध दृश्य निर्माण करून आपण आपल्यालाच विविध रूपात पाहत असतो की..! असंही वाटलं की एरव्हीही आपण जे जे पाहतो, अनुभवतो ते आपल्याच दृष्टिकोनातून. म्हणजे आपल्या आकलनातील दृश्य, घटना ही एका अर्थी आपलीच निर्मिती असते. म्हणजे आपण नेहमी आपल्यालाच पाहात, अनुभवत असतो...

असा कल्पनाविलास विषय समजून घ्यायला उपयोगी पडू शकेल... यात कुणाला काही भर घालता आली तर अवश्य घालावी.

३०.४.२०२०

***

## भाग ९

जे कोणाचे नव्हतेनि असणें । जे कोणाचे नव्हतां दिसणें ।
कोणाचे नव्हतां भोगणें । केवल जो ।।३६।।

ज्ञानरूप आत्मतत्त्व हे इंद्रियसंवेद्य अशा कोणत्याच मितीमधून उमगत नाही. त्याचे असणे, दिसणे इतकेच काय ते अनुभवणेही कोणत्याही मितीशिवायच असते.

*

संबंधांशिवाय  स्वतःत असणे
तसेच दिसणे  न होताही ।
भोग्य भोक्त्यावीण अखंड भोगणे
एकत्वी राहणे निरंतर ।।३६।।

**

आतापर्यंतच्या ३६ ओव्यांमधे वेगवेगळ्या उपमांच्या आधारे 'ते'चे म्हणजे आत्मतत्त्वाचे निरुपाधिक स्वरूप समजावले आहे. आता पुढील ओव्यांमधे जीव आणि आत्मतत्त्व यांच्या ऐक्याविषयी सांगितले आहे.

'तत्त्वमसि' - तत् त्वम् असि' - तत् म्हणजे ते, ते आत्मतत्त्व, त्वम् असि म्हणजे तू आहेस... ते (आत्मतत्त्व) तू आहेस. पुढील ओवीत यातील 'त्वम्' या पदाचे स्पष्टीकरण आहे.

तया पुत्र तूं वटेश्वराचा । रवा जैसा कापुराचा ।
चांगया मज तुज आपणयाचा । बोल ऐके ।।३७।।

चांगदेवा, तू वटेश्वराचा पुत्र आहेस. कापूर आणि कापराचा चुरा असं हे अंश-अंशी नातं आहे. (वटेश्वर हे चांगदेवांच्या दैवताचे किंवा गुरूचे नाव आहे.) वटेश्वराचा पुत्र असं म्हणून जीवस्वरूप चांगदेव ईशतत्त्वाचाच अंश आहेत हे अंश-अंशी नातं लक्षात आणून दिले आहे. चांगदेव आणि ज्ञानदेव यांची भेट झाली आहे. तेव्हाचा हा संवाद आहे. संवादासाठी व्दैत असावे लागते. पण ज्ञानेश्वरांना 'अव्दैत' समजून सांगायचे आहे. म्हणून या ओवीतील दुसऱ्या ओळीत म्हटले आहे, चांगदेवा, आपले हे बोलणे म्हणजे परमात्म-स्वरूप असलेल्या तुझे परमात्म-स्वरूप असलेल्या माझ्याशी बोलणे आहे ते तू समजून घे.

*

असशी तू पुत्र  वट-ईश्वराचा
रवा कापुराचा  असे जसा ।
चांगदेवा तसे  तू-मी नाही द्वैत
एकत्व दोघात ऐक कसे ।।३७।।

**

दोघांच्या अव्दैत भेटीचे स्वरूप कसे आहे ते पुढील ओवीत उपमा देऊन समजावले आहे.

ज्ञानदेव म्हणे । तुज माझा बोल ऐकणें ।
ते तळहाता तळीं मिठी देणें । जयापरि ।।३८।।

*

संवादात घडे बोलणे, ऐकणे
दोन्ही एक, म्हणे ज्ञानदेव ।
जसा तळहात तळहाता तळी
देऊ पाहे मिठी तसेच हे ।।३८।।

**

पुढील दोन्ही ओव्यांमधे ज्ञानदेव आपली भेट, आपल्यातील संवाद कसा आहे? ते वेगवेगळ्या उपमांच्या आधारे चांगदेवाना समजावत आहेत..

बोलेंचि बोल ऐकिजे । स्वादेंचि स्वाद चाखिजे ।
कां उजिवडे देखिजे । उजिडा जेंवी ।।३९।।

*

आपलाच ध्वनी ऐकावा बोलाने
चाखावे स्वादाने स्वादालाच ।
किंवा उजेडाने यावे उजेडात
स्वतःच पहावे उजेडाला ।।३९।।

**

सोनिया वरकल सोनें जैसा । कां मुख मुखा हो आरिसा ।
मज तुज संवाद तैसा । चक्रपाणि ।।४०।।

वरकल म्हणजे कसोटी. सोन्याला सोन्याचीच कसोटी लागावी तसे परमात्म-स्वरूप असलेल्या तुझी परमात्म-स्वरूप असलेल्या माझ्याशी ही भेट म्हणजे जणू आपापल्या मुखांच्या आरशात आपण एकमेकांना पाहत आहोत..

मुखापुढे जणू मुखाचा आरसा
कसोटी सोन्याला सोन्याचीच ।
तसा चांगदेवा आपुला संवाद
आहे कुठे भेद दोघामधे?।।४०।।

३.५.२०२०

***

## भाग १०

गोडिये आपली गोडी । घेतां काय न माये तोंडीं ।
आम्हा परस्परें आवडी । तो पाडु असे ।।४१।।

✻

या ओवीचा अर्थ डॉ. वा पु गिंडे यांच्या पुस्तकात असा दिलेला आहे- 'गोडीला आपली गोडी चाखताना ती त्याच्या तोंडात मावत नाही काय? आपली दोघांची एकमेकांविषयीची आवड देखील याच प्रकारची आहे.' इतर पुस्तकातही साधारण असाच अर्थ दिलेला आहे. माझे पद्यरूपांतर थोडे वेगळे झाले आहे.. पाडु- पाड म्हणजे महत्त्व, योग्यता, मान, किंमत

आपुलीच गोडी जर चाखायाची
गोडीला जिभेची सोय हवी ।
तसाच आपला जाणाया जिव्हाळा
द्वैताचा उमाळा लागेल ना?।।४१।।

✻✻

दोन आत्मस्वरूप पुरुषांची देहरूपात भेट होते आहे. तेव्हाचा ज्ञानेश्वरांचा अत्यंत तरल मनोभाव या ओवीत व्यक्त झाला आहे. अव्दैतानुभूती त्यांच्या मनात इतकी दृढ आहे की त्यांना ही भेट स्वतःसिद्ध आहेच असे वाटते आहे. आता देहरूपात भेट घेण्यास मन उत्सुक आहे पण त्यामुळे हा 'सिद्धभेट'भाव विचलित होईल म्हणून भेटीचा विचार भिववितो आहे असं त्यांनी म्हटलं आहे.

पुढील ओव्यांमधेही हाच भाव, व्दैतात उतरण्यातल्या अवघडलेपणाचे परोपरीने वर्णन केलेले आहे. या वर्णनातील सूक्ष्मता आणि काव्यात्मता विलोभनीय आहे.

सखया तुझेनि उद्देशें । भेटावया जीव उल्हासे ।
कीं सिद्धभेटी विसकुसे । ऐशिया बिहे ।।४२।।

✻

भेटीसाठी जीव उल्हसतो पण
तू, मी असे दोन आहे कुठे?।
बिघडेल काय 'सिद्ध-भेट'भाव
भेटीचा विचार भिववितो ।।४२।।

✻✻

घेवों पाहे तुझें दर्शन । तंव रूपा येवों पाहे मन ।
तेथे दर्शना होय अवजतन । ऐसें गमों लागे ।।४३।।

अवजतन- दर्शनाचा विचार जतन करणं अवघड वाटू लागत

*

घ्यावया दर्शन मन प्रकटेल
तेव्हा मावळेल नित्य-भेट ।
अशा विचाराचा येता अडसर
दर्शन अशक्य वाटू लागे ।।४३।।

**

कांहीं तरी बोले कल्पी । कां न करी न बोले न कल्पी ।
ये दोन्ही तुझ्या स्वरूपीं । *न घेति उमसू ।।४४।।

*न घेती उमसू म्हणजे स्फुरत नाही

*

मग ते बोलणे, करणे, कल्पणे
किंवा नाकारणे शक्य काय?।
शक्य होते दोन्ही वेगळेपणात
अद्वैत स्थितीत होणे नाही ।।४४।।

**

चांगया ! तुझेनि नांवें । करणें न करणें न व्हावें ।
हे काय म्हणों परि न धरवें । मीपण हें ।।४५।।

दोघांमधे वेगळेपणाची कल्पनाच करता येत नाहीए कारण 'मी'-'तू'पण हा व्दैतभाव स्विकारताच येत नाहीए...

वेगळेपणाने करावया काही
माझे 'मी'पणही धरवेना ।
चांगदेवा तेथ वेगळे 'तू'पण
धरावे कुठून अद्वैतात?।।४५।।

७.५.२०२०

***

## भाग ११

लवण पाणियाचा थावो । माजि रिघोनि गेलें पाहो ।
तंव तेंचि नाहीं मा काय घेवो । माप जळा ।।४६।।

अव्दैत भेटीच्या स्वरूपाचे स्पष्टीकरण उपमा देऊन केले आहे... थावो म्हणजे ठाव, खोली. रिघोनि गेले म्हणजे मिसळून गेले.

*

लवण पाण्यास  मोजण्या निघाले
मिळूनिया गेले  पाण्यामधे ।
मोजावया पाणी  तेच ना उरले
स्वतः पाणी झाले  मोजे कोण?।।४६।।

**

तैसें तुज आत्मयातें पाही । देखो गेलिया मीचि नाहीं ।
तेथें तूं कैचा काई । कल्पावया जोगा ।।४७।।

*

तसे तुझ्या ठायी स्वरूप पाहता
'मी'पणाच माझा उरला ना ।
स्वरूपावेगळे तुझे रूप मग
'तू' म्हणून सांग  काय कल्पू?।।४७।।

**

जो जागोनि निद देखे । तो देखणेपणा जेंवि मुके ।
तेंवि तूंतें देखोनि मी ठाके । कांही नहोनि ।।४८।।

काही नहोनि म्हणजे काही बदल न होता, सहजस्थितीत..

*

जाग आल्यावर  निद्रा न दिसते
द्रष्टत्वही जाते  तिच्यासवे ।
तसे तुझ्या भेटी  होतो मी विलीन
राहे भेदावीण  केवल मी ।।४८।।

**

आंधाराचे ठायीं । सूर्यप्रकाश तंव नाहीं ।
परी मी आहें हें कांहीं । न वचेचि जेंवि ।।४९।।

अंधारात काहीच दिसत नाही. जणू सारे गडप होते. तरी 'मी आहे' ही जाणीव ( न वचेचि) नष्ट होत नाही.

*

अंधाराचे ठायी  प्रकाश नसतो
दृश्या लपवतो आपणात ।
काही न दिसते दृश्य जग, देह
आहे 'मी' जाणीव उरे फक्त ।।४९।।

**

तेंवी तूंते मी गिंवसी । तेथें तूंपण मीपणेंसी ।
उखते पडे ग्रासीं । भेटीचि उरे ।।५०।।

चांगदेवा, आपल्या 'आत्मभेटी'त तुझे 'तू'पण आणि माझे 'मी'पण सर्व (उखते) विलीन झाले. (पडे ग्रासीं) आणि फक्त 'भेट' उरली.

अव्दैत विचार केवळ शब्दात, तर्काने किंवा ग्रंथातले संदर्भ देऊन न सांगता दोघांच्या भेटीच्या प्रत्यक्ष अनुभवातून प्रचिती देत समजावण्याची ज्ञानदेवांची शैली अद्‌भुत आहे.

*

तसा तुझ्यामध्ये मला मी मिळालो
मी, तू मावळलो आपोआप ।
तू, मी या उपाधी होताच विलीन
उरलो आपण स्व-रूपात ।।५०।।

१०.५.२०२०

***

## भाग १२

ज्ञानदेव आणि चांगदेव यांची अद्वैताची प्रचिती देणारी 'भेट' घडली.. 'ते भोगिली अनुवादी । घोळघोळू ।।' असं म्हणत पुढील ओव्यांमधे ज्ञानदेवांनी ही प्रचिती विविध उपमांमधे घोळवून घोळवून साद्यंत सांगितली आहे...

डोळ्याचे भूमिके । डोळा चित्र होय कौतुकें ।
आणि तेणेंचि तो देखे । *न डंडळिता ।।५१।।

*न डंडळिता म्हणजे न डळमळता..

✻

डोळ्याच्या ठिकाणी डोळ्याचेच चित्र
बनतसे दृश्य स्वये डोळा ।
आणि पाहण्याचे साधनही तोच
पाहतो त्यानेच अनायासे ।।५१।।

✻✻

तैसी उपजतां गोष्टी । न फुटतां दृष्टी ।
मीतूंवीण भेटी । माझी तुझी ।।५२।।

✻

तसा हा संवाद 'मी-तू'पणाविण
एकत्वाची खूण लोपते ना ।
दृश्य तोच द्रष्टा द्रष्टा तेच दृश्य
क्रियेविण भेट तुझी माझी ।।५२।।

✻✻

आतां मी तूं या उपाधी । ग्रासूनि भेटी नुसधी ।
ते भोगिली अनुवादी । घोळघोळू ।।५३।।

✻

गळून उपाधी अद्वयची झालो
आपण नुरलो वेगळाले ।
अशा या भेटीचा करू अनुवाद
भोगूया आनंद पुन्हा पुन्हा ।।५३।।

✻✻

'भोगूया आनंद पुन्हा पुन्हा'.. तो आत्मसात करण्यासाठी नव्या उपमांची रसपूर्ण तोंडीलावणी...

रुचतियाचेनि मिसें । रूचितें जेविजे जैसें ।
कां दर्पणव्याजें दिसे । देखतें जेंवि ।।५४।।

*

भोक्त्याच्या निमित्ते रुचीच जेवते
रुची आस्वादते रुचिलाच ।
निमित्त केवळ आरशाचे होई
पाहणारा पाही पाहत्याला ।।५४।।

**

तैसी अप्रमेयें प्रमेयें भरलीं । मौनाचीं अक्षरें भलीं ।
रचोनि गोष्टी केली । मेळियेचि ।।५५।।

प्रमेय ही गणितातली संज्ञा आहे. प्रमेय म्हणजे तर्काने, प्रमाणाने सिद्ध करता येईल असे विधान. परमतत्त्व अशा प्रमेयांच्या पलिकडे आहे. ते समजण्या-समजावण्यासाठी आत्मप्रचिती आलेल्या अवस्थेतले मौनच हवे..

*

तसे प्रमेयांच्या पल्याड जे आहे
त्याला मोजियले प्रमेयांनी ।
त्यांत जडवून अक्षरे मौनाची
खूण एकत्वाची दखविली ।।५५।।

१४.५.२०२०

***

## भाग १३

इये करूनि व्याज । तूं आपणयातें बुझ ।
दीप दीपपणें पाहे निज । आपुलें जैसें ।।५६।।

'खूण एकत्वाची दखविली'... आता याचं निमित्त (व्याज) करून तू स्वयंप्रकाशात स्वतःला जाणून (बुझ) घे..

*

आता या मौनात स्वरूप तू जाण
झाकलेले ज्ञान उघडून ।
स्वयंप्रकाशात होऊनिया दीप
पाही निजरूप दीप जसा ।।५६।।

**

आतापर्यंत जे शब्दात सांगितलं ते आता स्वतः अनुभवून बघ...

तैसी केलिया गोठी । तया उघडिजे दृष्टी ।
आपणिया आपण भेटी । आपणामाजीं ।।५७।।

*

उघडून आत तशी ज्ञानदृष्टी
सांगितल्या गोष्टी अनुभवी ।
स्वरूपबोधाने आपणच घेई
आपुल्याच भेटी आपणात ।।५७।।

**

आपली आपल्याशी भेट कशी ते स्पष्ट करण्यासाठी या ओवीत किती सुंदर उपमा दिलीय बघा.. आशयाचं जणू दर्शनच घडवते आहे..

जालिया प्रळयीं एकार्णव । अपार पाणियाची धांव ।
गिळी आपुला उगव । तैसें करी ।।५८।।

*

प्रलयाचे पाणी अपार धावते
सागरच होते विश्व सारे ।
गिळून उगम एकाकार होई
तैसे करी काही चांगदेवा ।।५८।।

**

आत्मप्रचिती कशी घ्यावी या विषयीचा उपदेश पुढील दोन ओव्यांमधे शुभचिंतनाकडे वळला आहे...

ज्ञानदेव म्हणे नामरूपें । विण तुझें साच आहे आपणपें ।
तें स्वानंदजीवनपे । सुखिया होई ।।५९।।

*

नाम-रूपाविण असणे जे तुझे
तेच नित्य, म्हणे ज्ञानदेव ।
स्वरूप-ज्ञान हे दृढ व्हावे मनी
स्वानंदाचा धनी व्हावेस तू ।।५९।।

**

चांगया पुढत पुढती । घरा आलिया ज्ञानसंपत्ति ।
वेद्यवेदकत्वही अतीतीं । पदीं बैसें ।।६०।।

*

पुन्हा पुन्हा नीट ऐक चांगदेवा
ज्ञान-धन घरा आल्यावर ।
ज्ञेय-ज्ञात्यापार अवस्थेचे पद
लाभेल निर्वेध बैस तेथे ।।६०।।

१७.५.२०२०

***

## भाग १४

परोपरीनं उपदेश करून झाला, शुभचिंतन झाले आता पुढील ओव्यांमधे ज्ञानेश्वर समारोप करत आहेत. त्यातली अंतर्मुख विनम्रता पाहण्यासारखी आहे-

चांगदेवा तुझेनि व्याजें । माउलिया श्रीनिवृत्तिराजें ।
स्वानुभव रसाळ खाजें । दिधलें लोभें ।।६१।।

✻

निवृत्तीनाथांनी तुझ्या निमित्ताने
मज बोलविले चांगदेवा ।
रसाळ पक्वान्न आत्मानुभवाचे
अत्यंत प्रेमाने दिले मज ।।६१।।

✻✻

एवं ज्ञानदेव चक्रपाणी ऐसे । दोन्हीं डोळस आरिसे ।
परस्पर पाहतां कैसें । मुकले भेदा ! ।।६२।।

✻

ज्ञानदेव आणि चांगदेव ऐसे
डोळस आरसे दोघेजण ।
परस्परांमधे पाहता स्वरूप
दोघे आपोआप मुकले भेदा ।।६२।।

✻✻

चांगदेवपासष्टीमध्ये चांगदेवांना आत्मबोधाचा उपदेश केलेला आहे. पण तो केवळ त्यांच्यापुरता नाही. जो जो कुणी हे सर्व समरसून वाचेल त्यालाही या ओव्यांच्या आरशात ‘स्व’-रूप दिसेल.

तियेपरी जो इयां । दर्पण करील ओविया ।
तो आत्मा एवढिया । मिळेल सुखा ।।६३।।

✻

तसा जो ओव्यांचे आरसे करेल
स्वरूप दिसेल त्याला त्यात ।
स्वरूप-बोधाचा येता अनुभव
सुखाचे वैभव प्राप्त होई ।।६३।।

✻✻

'स्व-रूप दिसेल' ही फलश्रुती अधिक न लांबवता शेवटी पुन्हा 'स्व-रूप दिसेल' म्हणजे काय होईल ते सांगितले आहे. निर्गुण- निराकार- निरुपाधिक अशा अत्मतत्त्वाशी एकरूप होणं म्हणजे द्रष्टा-दृश्य-दर्शन ही त्रिपुटी विसर्जित झालेल्या शून्यावस्थेत जाणं..! हा अमृतानुभव शब्दात सांगायचा तर किती कसरत करावी लागते ते पुढील ओवीत दिसून येईल. ते समजून घेताना आपल्याला त्याहून अधिक कसरत करावी लागते..

नाहीं तेंचि काय नेणों असें । दिसे तेंचि कैसें नेणों दिसें ।
असें तेंचि नेणों आपैसें । तें की होईजे ।।६४।।

जे इंद्रियगोचर नाही ते काय असेल ते कळत नाही (नेणो). जे दिसते, जाणवते तेच ते आहे का तेही कळत नाही. खरंतर ते स्वयंभूपणे आयतेच आहे. त्यामुळे 'एकरूप होणे' ही क्रियाच संभवत नाही.

नाहीच जे, काय असेल ते नेणो
दिसे कैसे नेणो दिसे तेही ।
नेणो काय आहे केवल ते असे
आयते जे त्याचे काय होणे?।।६४।।

**

आणि शेवटी 'ज्ञानदेवो म्हणे' ही मुद्रा उमटवून चांगदेवपाशष्टीचा समारोप केला आहे-

निदेपरौते निदैजणें । जागृति गिळोनि जागणें ।
केले तैसे गुंफणें । ज्ञानदेवो म्हणे ।।६५।।

सार्थ चांगदेवपासष्टी आणि सार्थ ताटीचे अभंग' या पुस्तकात डॉ. म. वि. गोखले यांनी 'निदेपरौते निदैजणें । जागृति गिळोनि जागणें ।' याचे छान स्पष्टीकरण दिलेले आहे. ते थोडक्यात असे-

'निदेपरौते निदैजणें' म्हणजे जागृती, स्वप्न आणि सुषुप्ती या अवस्थांपलीकडील अवस्था. म्हणजे ज्ञानरूप आत्मनिद्रेची अवस्था. या अवस्थेत 'अहम्' वृत्तीचा लय झालेला असतो. 'व्यावहारिक जागृती' या अवस्थेत 'गिळून' टाकली जाते. परंतू तरीही तेथे आत्मज्ञानस्वरूप 'जागृतीचे जागणे' चालूच राहते. हीच ती पूर्ण जागृती..!

स्वरूप-निद्रा ती निद्रेच्या अतीत
जागृती निद्रेत जाग आणे ।
गिळून जागृती 'जागे' होण्यासाठी
दिली नवी दृष्टी ज्ञानदेवे ।।६५।।

**

चांगदेवपासष्टी या उपक्रमाची आज सांगता होते आहे. या निमित्ताने पूर्वी केलेल्या अभ्यासाची उजळणी झाली. मिळालेल्या प्रतिसादानुसार प्रत्येक ओवीवर पुन्हा विचार झाला. अर्थात हे सर्व शब्दपातळीवरूनच..! याची पूर्ण जाणीव असली तरी यातील अद्वैतानुभव क्षितिजासारखा दुरून पाहता.. दाखवता आला याचे समाधान वाटते आहे.

२१.५.२०२०

***

# गीता आणि आपण

गीता आणि आपण

# प्रास्ताविक

'आनंदघन' या दिवाळीअंकासाठी 'मी आणि भगवद्गीता' या विषयावर लेख लिहायचा होता. विषय समजल्यावर पहिला विचार मनात आला तो हा की मी मूळ संस्कृत गीता वाचलेलीच नाहीए. गीताई, ज्ञानेश्वरी आणि अन्य वाचनातून गीतेचा विषय माहिती होता. त्यावर थोडाफार विचारही झालेला होता. पण मूळ गीता न वाचताच 'मी आणि भगवद्गीता' या विषयावर लिहिणं योग्य नाही असं वाटलं. वडिलांनी दिलेली गीता घरात होती. पण संस्कृत कळत नाही म्हणून मी कधी ती उघडूनही पाहिली नव्हती. या निमित्ताने ती वाचावी असं मनात आलं. सुदैवानं गीतेचा अभ्यास करणारी, पूर्ण गीता पाठ असलेली मैत्रीण शेजारीच राहात होती. तिच्या मदतीनं रोज दहा श्लोक म्हणायला सुरुवात केली. सोबत गीताई घेतली. पण लक्षात आलं की आधी अर्थ वाचून मग श्लोक वाचतानाही काही कळत नाहीए. मग गीताई बाजूला ठेवली आणि पूर्ण गीता फारशी न समजताच वाचली. वाचताना मधे मधे कर्मण्येवाधिकारस्ते...', यदा यदा हि धर्मस्य...' असे बरेचदा कानावर पडलेले, इतरत्र वाचनात आलेले काही ओळखीचे श्लोक भेटत होते. त्यावर खुणा करून ठेवल्या. आणि सवयीने ते निवडक, महत्त्वाचे श्लोक एकत्र लिहून काढले. त्या दरम्यान महाभारत मालिका पुन्हा पाहायला मिळाली त्यामुळे गीतेची सर्व पार्श्वभूमी दृक्श्राव्य झाली. महाभारतात ज्या प्रसंगी गीता सांगितली आहे तो प्रसंग पाहताना ते सगळे 'ओळखीचे श्लोक' समक्ष भेटले आणि आणखी जवळचे झाले.

आपला अभ्यास असो नसो गीताविषय ढोबळमानाने तरी आपल्याला माहिती असतो. त्यावर थोडाफार विचार झालेला असतो. आपल्या सुप्रभात उपक्रमात आता गीता आणि आपल्यातल्या या नात्याला उजाळा द्यावा असं मनात आलं. त्यासाठी मी लिहून घेतलेल्या श्लोकांपैकी एकेक श्लोक विचारात घेऊ. मूळ संस्कृत श्लोक, त्याचा अर्थ असलेला गीताईतला श्लोक आणि त्याचा मला समजलेला अर्थ मी देईन. जमेल त्यानी त्यात भर घालावी. त्या अनुषंगानी काही विचार मानात आले तर तेही लिहूया...

२५.५.२०२०

***

## भाग १

हा श्लोक फारसा परिचित नाही. पण विषयाची सुरुवात म्हणून तो घेतला आहे. गीतेची पार्श्वभूमी सर्वांना माहितीच आहे. शांती-प्रस्तावाचे सर्व मार्ग खुंटल्यावर युद्धाला पर्याय उरत नाही. कुरुक्षेत्रावर दोन्ही बाजूचे सैन्य सुसज्ज होऊन समोरासमोर येते. 'आक्रमण' म्हणून युद्धाला सुरुवात होण्यापूर्वी अर्जुन आपला रथ कौरवसैन्यासमोर नेण्याची विनंती कृष्णाला करतो. कृष्ण रथ मधोमध नेऊन उभा करतो. अटळ ठरलेल्या महायुद्धात लढण्यासाठी समोर आपलेच गुरूजन, पितामह, भाऊबंध आहेत हे बघून अर्जुन कमालीचा अस्वस्थ होतो. परिणामांच्या विचाराने भयभीत, व्याकुळ होतो... त्या मनःस्थितीत युद्ध केल्यामुळे काय काय अनर्थ ओढवेल याचं चित्र त्याच्या डोळ्यापुढं उभं राहातं. तेव्हा स्व-जनांना मारून आम्ही सुखी कसं व्हावं? असा प्रश्न त्याला पडतो. या श्लोकात हाच प्रश्न त्याने कृष्णाला विचारला आहे. तो श्लोक असा-

गीता

अर्जुन उवाच-

तस्मान्नार्हा वयं हन्तुं धार्तराष्ट्रान्स्वबान्धवान् ।
स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम माधव ।।१/३७।।

गीताई-

म्हणूनि घात बंधूंचा आम्हा योग्य नव्हे चि तो
आम्ही स्व-जन मारूनि सुखी व्हावे कसे बरे ।।१/३७।।

हा प्रश्न विचारताना अर्जुनाच्या मनात असलेला संघर्ष आणि निर्णय घेण्यातला पेच आपल्या जगण्याशी कसा जोडून घेता येईल?

**

सध्या आपल्या सर्वांना अर्जुनापेक्षा फार वेगळ्या, विचित्र युद्धाला सामोरे जावे लागत आहे. या युद्धातला अदृश्य शत्रू आपल्या भोवतीच्या कुणाच्याही माध्यमातून आपल्यावर चाल करू शकतो. सगळ्यांपासून सतत चार हात दूर राहायचेय.. सगळेच संशयित.. अगदी आपले स्वतःचे हात सुद्धा..! आणि आपण स्वतःसुद्धा दुसऱ्यांच्या नजरेत संशयित. आपल्या सर्वांनाच बहाल झाली आहे 'दिव्य दृष्टी'. घरबसल्या आपण पाहू शकतोय या युद्धाने चालवलेली वाताहत.. घाबरून सैरभैर झालेली माणसं.. कुणाकुणाला वाळीत

टाकलं जाणं.. आपण साजरी करतोय आपली दिनचर्या 'मजेत' पण तिच्या तळातली धास्ती आपलं काम करतेच आहे.

अशा प्रत्येक वेळचा आपल्या मानातला संघर्ष दडपून न टाकता तो ओळखून त्याला सामोरं जायला हवं. जीवनातल्या पेचांचं स्वरूप आधी आपल्याला स्पष्ट व्हायला लागतं. मग त्यातून मार्ग काढता येतो... आजच्या श्लोकातून मनातील संघर्ष ओळखण्याची गरज सूचित होतेय असं मला वाटलं.

अर्जुनाच्या प्रश्नाला कृष्णानं दिलेलं उत्तर म्हणजे गीता तत्त्वज्ञान. ते पुढच्या श्लोकांमधून उलगडत जाणार आहे. सर्वांकडून जितका सक्रीय सहभाग मिळेल तेवढा अधिक उलगडा होत जाईल. ही प्रक्रिया ज्याची त्याला आणि इतरांनाही मार्ग दाखवेल...

२५.५.२०२०

***

## भाग २

गीतेचे एकूण अठरा अध्याय आहेत. आणि त्यात सातशे श्लोक आहेत. त्यापैकी फक्त २६ श्लोक विचारार्थ निवडले आहेत. स्वाभाविकपणे आशयाच्या दृष्टिने त्यात सलगता नाहीए. त्यामुळे प्रत्येक श्लोक समजून घेताना त्या श्लोकाची पार्श्वभूमी समजून घ्यावी लागेल.

गीतेतील पहिल्या अध्यायात,‘अरेरे केवढे मोठे पाप करायला आम्ही निघालो आहोत..’ अशा शब्दात अर्जुन आपल्या मनातील विषाद परोपरीनं व्यक्त करतो आहे. या अध्यायाचं नावच . ‘अर्जुनविषादयोग’ असं आहे. असं सर्व बोलून, मी लढणार नाही म्हणून धनुष्य खाली ठेवून अर्जुन हताशपणे बसून राहतो. इथं पहिला अध्याय संपतो.

दुसऱ्या अध्यायापासून कृष्णाचे अर्जुनाला समजावणे सुरू होते. हरप्रकारे समजावून सांगत कृष्ण अर्जुनाला युद्धाला तयार करतो. पण हे सहजी घडत नाही. अर्जुन कृष्णाला मधे मधे प्रश्न विचारत राहातो. त्या शंकांचे निरसन करता करता पूर्ण तत्त्वज्ञान सांगितले जाते. त्यापैकी एक महत्त्वाचा विचार पुढील श्लोकात सांगितलेला आहे.

गीता

श्रीभगवानुवाच-

नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः ।
उभयोरपि दृष्टोऽन्तस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः ।।२/१६।।

गीताई

नसे मिथ्यास अस्तित्व नसे सत्यास नाश हि ।
निवाडा देखिला संती ह्या दोहींचा अशापरी ।।२/१६।।

सरळ अर्थ-

मिथ्या, असत् गोष्टींना अस्तित्व असत नाही आणि सत् गोष्टींचा नाश होत नाही. ज्ञानी लोक या दोन्हीतला फरक जाणतात. (हा गीताईतील मराठी श्लोकाचा अर्थ आहे. मूळ संस्कृत श्लोकातील शब्दांची फोड करून अधिक नेमका, खोलातला अर्थ समजू शकेल. ज्यांना सांगता येत असेल त्यांनी अवश्य सांगावा)

अर्थविस्तार-

कृष्ण अर्जुनाला म्हणतो, तू भलत्यावेळी शोक करतो आहेस आणि फार पुढला विचार करत असल्यासारखे बोलतो आहेस. पण खरे ज्ञानी लोक जन्म-मृत्यूविषयी शोक करत नाहीत. तू, मी, हे सर्व राजे... पूर्वी नव्हतो आणि पुढेही असणार नाही. आताच्या या जन्मात देहाला बाल्य, तारुण्य, वृद्धत्व अशा अवस्था येतात. तसाच मृत्यूनंतर नवा देह प्राप्त होतो. जगताना अनेक गोष्टी सुख-दुःखाचा अनुभव देतात. पण ते सर्व क्षणिक, तात्पुरते असते. हे जाणून जो जगण्यातील सर्व घटनांकडे अलिप्ततेने पाहू शकतो त्याला सुख-दुःख सर्व समान वाटतं... मिथ्या, 'असत्'ला अस्तित्व असत नाही आणि 'सत्'चा नाश होत नाही. (सत् म्हणजे जे 'आहे' ते, असणे ही एकमेव मिती असलेले मूलतत्त्व... जे सत् कडे नेते ते सत्य) ज्ञानी लोक या दोन्हीतला फरक जाणतात. (म्हणून हे अर्जुना, युद्धाच्या परिणामांचा विचार करून तू हतबल होऊ नकोस. आपले कर्तव्यकर्म कर.)

'ज्ञानी लोक या दोन्हीतला फरक जाणतात' हे सांगणारी एक छान ओवी ज्ञानेश्वरीत आहे- 'सलील पय जैसे । एक होऊनि मिनले असे । परी निवडूनी राजहंसे । वेगळे कीजे ।।' ज्ञा. २/१२७

१.६.२०२०

***

## भाग ३

गीतेच्या पहिल्या अध्यायात गीता-विषयाची प्रस्तावना आहे तर 'सांख्ययोग' या दुसऱ्या अध्यायात बीजभाषण असावे तशी उपदेशाची दमदार सुरुवात आहे. 'आत्मज्ञान आणि समत्वबुद्धी' या विषयीचा सर्व उपदेश यात थोडक्यात सांगितलेला आहे. इतर अध्यायांच्या मानाने हा अध्याय मोठा आहे. यात एकूण ७२ श्लोक आहेत. सुरुवातीला आत्मतत्त्वाविषयी सांगितले आहे. त्यातील एक सर्वश्रुत श्लोक आज विचारार्थ घेतला आहे.

गीता

वासांसि जीर्णानि यथा विहाय
नवानि गृण्हाति नरोऽपराणि ।
तथा शरीराणि विहाय जीर्णा-
न्यन्यानि संयाति नवानि देही ।।२/२२।।

गीताई

सांडूनियां जर्जर जीर्ण वस्त्रें
मनुष्य घेतो दुसरीं नवीन
तशी चि टाकूनि जुनीं शरीरें
अत्मा हि घेतो दुसरीं निराळीं ।।२/२२।।

ज्ञानेश्वरी

जैसे जीर्ण वस्त्र सांडिजे । मग नूतन वेढीजे ।
तैसे देहांतरातें स्वीकारिजे । चैतन्यनाथे ।। २ / १४४

सरळ अर्थ-

वस्त्रं जुनी, जीर्ण झाली की आपण ती टाकून देतो आणि नवीन परिधान करतो त्याप्रमाणे आत्माही जुनी शरीरे टाकून नवीन शरीरे धारण करत असतो.

अर्थविस्तार-

ज्ञानेश्वरांनी हाच आशय देहांतर, 'चैतन्यनाथ' असे काव्यात्म शब्द वापरून किती सुंदर करून सांगितला आहे..! काव्यात्म शब्द, उपमा यामुळे आशय केवळ सुंदर होत नाही तर

त्यातून आशयाचे विविध पैलू उलगडले जातात आणि त्यातली सूक्ष्मता लक्षात येते.

आजच्या श्लोकाविषयी काही लिहिण्यापूर्वी मागच्या सोमवारी विचारात घेतलेल्या श्लोकातील नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः...' याविषयी पुन्हा थोडक्यात उलगडा-

सुवर्णालंकाराची म्हणजे दृश्य आकारांची कितीही रूपांतरे झाली तरी त्यातील सुवर्णाचा नाश होत नाही. त्याप्रमाणे दृश्य सृष्टीतील घटकांची कितीही रूपांतरे झाली तरी त्यातील (सत्) ब्रह्मतत्त्वाचा नाश म्हणजे अभाव होत नाही. शुद्ध सोन्याच्या अलंकारातून सोनं काढून घेतलं तर अलंकार म्हणून काय उरेल? काही नाही. भावरूपात नसलेले हे 'काही नाही' म्हणजे असत्. म्हणून म्हटले आहे, सत् वस्तूचा अभाव आणि असत् वस्तूचा भाव केव्हाही संभवत नाही.

ज्यातून या संपूर्ण विश्वाची निर्मिती झाली ते सत्तत्त्व (ब्रह्मतत्त्व) अविनाशी आहे. त्या नित्य-तत्त्वाचा नाश कोणी करू शकत नाही. तेच तत्त्व पंचमहाभूतात्मक देहात वसलेले असते. त्याला आत्मा म्हटले जाते. देह विनाशी असतो पण त्यातील आत्मतत्त्व अविनाशी आहे. त्याला कोणी मारू शकत नाही. त्यामुळे युद्धात कोणी मारणारा असत नाही आणि कोणी मरणारा असत नाही. या आत्म-तत्त्वाला ना जन्म असतो ना मृत्यू. देह येतात..जातात. आत्मतत्त्व स्थिर असते. वस्त्रं जुनी, जीर्ण झाली की आपण ती टाकून देतो आणि नवीन परिधान करतो त्याप्रमाणे आत्माही जुनी शरीरे टाकून नवीन धारण करत असतो. अर्जुना, हे लक्षात घे की आत्मतत्त्व कधी नाश पावत नाही, विनाशी असलेले देहच युद्धात नष्ट होणार आहेत. त्यामुळे तुला शोक करण्याचे कारण नाही. तू फक्त निमित्तमात्र होऊन आपले कर्तव्यकर्म कर.

या उपदेशातील 'कर्तव्यकर्म' ही युद्धाची पूर्व अट आहे. इतर कोणताच पर्याय उरला नाही त्यामुळे युद्ध अटळ झाले. असे असताना ऐनवेळी कर्तव्यच्यूत होऊ लागलेल्या अर्जुनाला हा उपदेश आहे. या तत्त्वज्ञानाच्या आधारे वैयक्तिक स्वार्थासाठी कुणी कुणाला ठार मारणं समर्थनीय होणार नाही.

८.६.२०२०

***

## भाग ४

गीतेच्या सातशे श्लोकांमधून 'ओळखीचे श्लोक' निवडून लिहून काढल्यावर लक्षात आलं की निवडलेल्या २६ श्लोकांमधे दहा श्लोक दुसऱ्या अध्यायातलेच आहेत. एकेक करत हे श्लोक समजून घेताना दुसऱ्या अध्यायाचं महत्त्व उलगडत जाईल...

धर्मयुद्धासाठी कर्तव्यकर्म या भूमिकेतून अर्जुनाला कर्मप्रवृत्त करताना कृष्ण मूलभूत तत्त्वविचार समजावून देत आहे. या दृश्य विश्वाच्या अनित्यतेविषयी आणि आत्म्याच्या नित्य स्वरूपाविषयीचे विवेचन चालू आहे. आजचा श्लोक 'वासांसि जीर्णानि....' या श्लोकातील आशय पुढे नेणारा आहे.

गीता-

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ।।२/२३।।

गीताई-

शस्त्रे न चिरिती ह्यास, ह्यास अग्नि न जाळितो ।
पाणी न भिजवी ह्यास, ह्यास वारा न वाळवी ।।२/२३।

ज्ञानेश्वरी-

हा अनादि नित्यसिद्धु । निरुपाधि विशुद्धु ।
म्हणऊनि शस्त्रादिकी छेदु । न घडे यया ।।२/१४५

(गीतेतील २/२३,२४ या दोन श्लोकांसाठी ही एक ओवी आहे. त्यामुळे यात आजच्या २/२३ या श्लोकातील आशयापेक्षा थोडे अधिक वर्णन आले आहे.)

सरळ अर्थ-

ह्याला (आत्मतत्त्वाला) शस्त्रे छिन्नभिन्न करू शकत नाहीत, अग्नि जाळू शकत नाही, पाणी भिजवू शकत नाही की वायू वाळवू शकत नाही.

अर्थविस्तार-

शस्त्रे, अग्नी, पाणी, वायू ... यातून पृथ्वी, आप, तेज, वायू या चार महाभूतांचा निर्देश होतो. जगातील सर्व दृश्य वस्तू वेगवेगळ्या घटकांच्या संयोगातून निर्माण होत असतात. या सृष्ट

पदार्थांमधे पृथ्वी, आप, तेज, वायू या चारी व्यक्त जड द्रव्यांमुळे स्थित्यंतरे होत असतात. मात्र देहांतरांच्या प्रक्रियेत नित्यत्वाने स्थिर असणाऱ्या आत्मतत्त्वावर या कुणाचा काही परिणाम होत नाही. उत्पत्ती-लय, जन्म-मरण ही केवळ बाह्य रूपांतरे आहेत.

१५.६.२०२०

***

## भाग ५

मृत्यु... विनाश अटळ असूनही सृष्टी अखंडपणे फुलते, फळते, नांदते आहे, प्रत्येक मृत्यूला पराभूत करून नवा जन्म अवतरतो आहे त्या अर्थी या उत्पत्ती-विनाशाला कारण असणारे, उत्पत्ती-विनाशाच्या परे काहीतरी असले पाहिजे. ते काहीतरी काय आहे हे कुणालाही सांगता येत नसलं तरी असं काहीतरी असलं पाहिजे असं मानल्याशिवाय तत्त्वविचारांची गाडी पुढे सरकत नाही. भारतीय तत्त्वज्ञानात या 'काहीतरी'ला विश्वाच्या संदर्भात ब्रह्म आणि त्यातील घटकांच्या संदर्भात आत्मा म्हटले आहे.

या आत्मतत्त्वाविषयीचे विवेचन चालू आहे. शस्त्र, अग्नी, पाणी, वायू... कशाचाही आत्म्याच्या नित्यत्वावर काही परिणाम होत नाही. तो स्थिर, अविकारी अमूर्त आणि अचिंत्य आहे. अमूर्त असल्यामुळे ज्ञानेंद्रियांना तो उमगत नाही. अचिंत्य म्हणजे चिंतनातून मनालाही जाणता येत नाही. पण आपण सृष्टीतील उत्पत्ती-विनाश अनुभवत असतो. त्यावरून असंही म्हणता येईल की प्रत्येक जन्म-मृत्युबरोबर हाही दर क्षणी नाहीसा होतो आणि नव्याने जन्म घेतो...

आज यापुढचा विचार असलेले दोन श्लोक विचारार्थ घेतले आहेत.

गीता-

जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च ।
तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ।।२/२७।।

अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत ।
अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ।।२/२८।।

गीताई-

जन्मता निश्चये मृत्यु मरता जन्म निश्चये
म्हणूनि न टळे त्याचा व्यर्थ शोक करूं नको ।।२/२७।।

भूतांचे मूळ अव्यक्ती मध्य तो व्यक्त भासतो
पुन्हा शेवट अव्यक्ती त्यामधे शोक कायसा ।।२/२८।।

**

ज्ञानेश्वरी-

उपजे ते नाशे । नाशले पुनरपी दिसे । हे घटिकायंत्र तैसे । परिभ्रमे गा ।। २/१५९
तू जरी हे ऐसे मानसी । तरी खेदु का करिसी । काय जाणतचि नेणसी । धनुर्धरा।।२/१६२
जे समस्ते इये भूते। जन्माआदि अमूर्ते। मग पातली व्यक्तीते। जन्मलेया ।। २/१६४
तैसे आदीचि जे नाही । तयालागी तू रुदसि कायी । तूं अवीट ते पाही । चैतन्य एक ।।२/१६९

**

(गीताईप्रमाणे ज्ञानेश्वरीत एका श्लोकासाठी एक ओवी असं नाहीए. आज घेतलेल्या दोन श्लोकांसाठी पाच आणि आठ ओव्या आहेत. त्यातल्या चारच मी इथे घेतल्या आहेत. त्यात श्लोकातला पूर्ण आशय आलेला नसेल. पण मूळ श्लोक समजून घ्यायला यांचा उपयोग होऊ शकेल असं वाटतं.)

सरळ अर्थ-

जन्माला आलेल्या प्रत्येकाला मृत्यु निश्चित आहे. त्याचप्रमाणे मेल्यावर जन्मप्राप्तीही निश्चित आहे. म्हणून या अटळ गोष्टींसाठी तू उगीचच शोक करू नकोस. हे अर्जुना, भूतांचा (भूत म्हणजे जे निर्माण झाले आहे ते) आरंभ अव्यक्त असतो, मध्य व्यक्त दिसतो आणि अंतही अव्यक्तच असतो. यात शोक करण्यासारखं काय आहे?

अर्थविस्तार-

सृष्टीतील प्रत्येक घटक उत्पन्न होण्याआधी अव्यक्त स्वरूपात असतो. उत्पन्न झाल्यावर काही काळापुरता तो व्यक्त होतो आणि विनाश पावल्यावर पुन्हा अव्यक्त स्वरूपातच जातो. उत्पत्ती-स्थिती-विनाश हा सृष्टीचा क्रम चालूच असतो. अशा अपरिहार्य गोष्टींबद्दल दुःख करणे व्यर्थ आहे.

एका हिंदी गाण्यात हा तत्त्वविचार फार तरलतेनं व्यक्त झाला आहे. धुंध चित्रपटातील साहिर लुधियानवी यांनी लिहिलेल्या या गाण्याची सुरुवात अशी आहे- 'संसार की हर शै का इतना ही फसाना है / इक धुंध से आना है, इक धुंध में जाना है.' किती मर्मस्पर्शी आहेत ना या ओळी..!

आरंभाआधीच्या आणि अंतानंतरच्या दोन असीम 'अव्यक्तां'च्या मधे असलेली 'व्यक्त' सृष्टी त्या असीमांच्या तुलनेत किती अल्प काळ असते त्याचं अतिशय प्रत्ययकारी चित्र नंतरच्या दोन ओळीत आहे. त्या ओळी अशा- इक पल की पलक पर है ठहरी हुयी ये दुनिया / इक पल के झपकने तक हर खेल सुहाना है..!

माझ्या वडलांचंही याच आशयाचं एक वाक्य माझ्या कायम स्मरणात राहिलेलं आहे. ते असं- Life is a lantern between dark and dark..!'

हिंदी, मराठी गाण्यांची अशी आणखी काही उदाहरणं कुणाला आठवू शकतील. ती अवश्य शेअर करावित. गीता-विचार जनमानसात किती, कसा रुजला आहे ते त्यातून लक्षात येईल..

२२.६.२०२०

***

## भाग ६

हे अर्जुना, 'स्वधर्म म्हणून युद्ध करताना आपल्या हातून होणाऱ्या हत्येचे भय बाळगू नकोस कारण मारला जाईल तो नश्वर देह.. त्यात वास करणारा आत्मा शाश्वत असतो. क्षत्रियाला असे धर्मयुद्ध करायला मिळणे ही अनायासे मिळालेली संधी समज. हे युद्ध करण्यामुळे नाही तर हे कर्तव्यकर्म असलेले हे युद्ध टाळण्यामुळेच तुला पाप लागेल, तुझी अपकीर्ती होईल. भिऊन युद्धातून तू पळ काढलास असं म्हटलं जाईल. शत्रु तुझ्या शौर्याबद्दल शंका घेऊन तुझी निंदा करतील....'

यापुढचा आशय असलेले सर्वपरिचित दोन श्लोक आज विचारात घेतले आहेत.

गीता-

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।
तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयः ।।२/३७।।

सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।
ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ।।२/३८।।

गीताई-

मेल्याने भोगिसी स्वर्ग जिंकिल्याने मही-तळ
म्हणूनि अर्जुना ऊठ युद्धास दृढ-निश्चये ।।२/३७।।

हानि लाभ सुखे दुःखे हार जीत करी सम
मग युद्धास हो सिद्ध न लागे पाप ते तुज ।।२/३८।।

ज्ञानेश्वरी-

ना तरी रणीं येथ । झुंजता वेचले जीवित । तरी स्वर्गसुख अनकळित । पावसील ।। २/२२०
म्हणोनि ये गोठी । विचारु न करी किरीटी । आता धनुष्य घेऊनि उठी ।। झुंजे वेगी ।। २/२२१
सुखी संतोषा न यावे । दुःखी विषादा न भजावे । आणि लाभालाभ न धरावे । मनामाजी ।। २/२२६
ऐसेया मनें होआवे । तरी दोषु न घडे स्वभावे । म्हणोनि आता झुंजावे । निभ्रांत तुवा ।। २/२२९

## सरळ अर्थ-

हे कुंतीपुत्रा, युद्धामध्ये मरण पावलास तर स्वर्ग मिळवशील किंवा जय झाला तर पृथ्वीचा उपभोग घेशील. म्हणून युद्ध करण्याचा निश्चय कर आणि ऊठ...

सुख व दु:ख, लाभ व हानी आणि जय व पराजय सारखेच समजून युद्धाला प्रवृत्त हो. म्हणजे तुला पाप लागणार नाही.

## अर्थविस्तार-

या श्लोकांचा सरळ अर्थ समजण्यासारखा आहे. त्यात आशयाची गुंतागुंत नाही. मानवी अस्तित्वाचं सत्य स्वरूप सांगून, अपकीर्तीचं भय दाखवून, कर्तव्यकर्म करण्याने पाप लागत नाही असा दिलासा देऊन, जय-पराजय काही झालं तरी स्वर्ग किंवा पृथ्वीचं राज्य काहीतरी मिळेलच असं अमीष दाखवून 'तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयः' हेच अर्जुनाच्या मनावर ठसवणं चालू आहे... हे सर्व परोपरीनं सांगण्यामागे हा नाही तो.. कोणता तरी विचार किंकर्तव्यमूढ पार्थाला त्याच्या त्यावेळच्या निष्प्रभ मनःस्थितीतून बाहेर पडायला उपयोगी पडेल असा कृष्णाचा हेतू असणार...

तरी हे समजून घेताना काही प्रश्न पडतात... पाप लागणे, स्वर्गप्राप्ती... अशा संकल्पना युद्धासारखा निर्णय घेण्याचा आधार कशा होऊ शकतील?, सुख-दु:ख, लाभ-हानी आणि जय-पराजय सारखेच समजण्यासाठी मनाची दृढ अलिप्तता हवी. सर्व चित्तवृत्ती पूर्णतः सजग असण्याची गरज असलेली युद्धासारखी कृती प्रत्यक्ष करताना मन अलिप्त कसे ठेवता येईल?

पुढील श्लोकांतून याचा उलगडा होऊ शकेल...

२९.६.२०२०

***

# भाग ७

'सुखदुःखे समे कृत्वा....' या श्लोकापर्यंत अर्जुनाला युद्धसज्ज करण्यासाठी म्हणजे कर्मप्रवृत्त करण्यासाठी हरप्रकारे सांगून झालं. त्यासाठी पाप-पुण्य, अपकीर्ती, स्वर्गप्राप्ती.. अशा गौण गोष्टींचा विचार केला गेला. आता युद्ध, अर्जुनाची हतबलता.. या संदर्भांचे बोट सोडून कर्मयोगाकडे लक्ष वेधले आहे. कर्म तर करायचेच आहे. ते चुकत नाही. कारण त्याचा आरंभ पूर्वीच केव्हातरी झालेला असतो. कुठेतरी उगम पावलेल्या कर्मप्रवाहाच्या वाटेवर एका क्षणी आपण त्याच्या सम्मुख येतो. मग ते करावेच लागते. त्याला ओलांडून आपण पुढे जाऊ शकत नाही....

हे वाट्याला आलेलं कर्म 'कौशल्याने' कसे करावे त्याविषयी मार्गदर्शन करणारा सर्वपरिचित श्लोक आज विचारात घेतला आहे.

गीता

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संङ्गोऽस्त्वकर्मणि ।।२/४७।।

गीताई

कर्मात चि तुझा भाग तो फळात नसो कधी
नको कर्म-फळीं हेतु अकर्मी वासना नको ।।२/४७।।

ज्ञानेश्वरी

आम्ही समस्तही विचारिले । तव ऐसेचि हे मना आले ।
जे न सांडिजे तुवा आपुले । विहित कर्म ।। २/२६५
परी कर्मफळी आस न करावी । आणि कुकर्मी संगती न व्हावी ।
हे सत्क्रियाचि आचरावी । हेतूविण ।। २/२६६

सरळ अर्थ-

कर्म करण्यावर तुझा अधिकार आहे. त्याच्या फळावर नाही. म्हणून तू फळाची अपेक्षा ठेवू नकोस आणि कर्म टाळण्याचा विचारही करू नकोस.

अर्थविस्तार-

या श्लोकाचा सरळ अर्थ कोणाही सामान्य माणसाला विचारात पाडणारा आहे. कारण

दिनचर्येखेरीजच्या आयुष्यासाठी आधी आपण काहीतरी लहान-मोठे ध्येय ठरवतो आणि त्याच्या प्राप्तीसाठीच कार्यरत होतो. ध्येयसिद्धी हीच आपल्या सर्व प्रयत्नांमागची प्रेरणा असते. मग फळाची म्हणजे ध्येयप्राप्तीची अपेक्षा धरायची नाही हे कसं शक्य आहे? याचा उलगडा होण्यासाठी या श्लोकाच्या आधीच्या आणि नंतरच्या श्लोकांचा संदर्भ लक्षात घेणे आवश्यक आहे.

भारतीय तत्त्वज्ञानात 'मोक्ष' हे सर्वांसाठी समान असं उच्चतम ध्येय ठरवलेलं आहे. सर्व तात्विक विवेचन मोक्षप्राप्तीसाठी काय करायला हवे ते सांगण्यासाठीच केलेले आहे. यामधे मोक्षप्राप्तीचे दोन मार्ग सांगितले आहेत. एक ज्ञानमार्ग दुसरा कर्ममार्ग. ज्ञानमार्ग म्हणजे ब्रह्मज्ञान प्राप्त करणं. यात कर्मसंन्यास अपेक्षित आहे. तर कर्ममार्गात कर्मालाच मोक्षसाधन मानलं आहे. प्राचिन काळाच्या संदर्भात कर्म म्हणजे यज्ञकर्म. पण कर्म ही संकल्पना एवढ्यापुरती मर्यादित नाही. खूप व्यापक आहे.

मोक्ष ही संकल्पना बहुआयामी आहे. आणि प्रत्येक विचारप्रणाली मधे त्याची वेगवेगळी व्याख्या केलेली आहे. पण ढोबळमानाने मोक्ष..मुक्ती म्हणजे 'जन्म-मरणाच्या फेऱ्यातून सुटका' हा अर्थ रूढ आहे. कर्ममार्गात माणूस अडकला की त्याची जन्म-मरणाच्या फेऱ्यातून सुटका नाही. पण कर्म तर करावेच लागणार आहे. मग कर्म करूनही त्याच्या परिणामात अडकायचं नसेल तर काय करायचं? गीतेत त्यासाठी निष्काम कर्मयोग हा मार्ग सांगितला आहे. 'कर्मण्येवाधिकारस्ते...' या श्लोकापासून या विवेचनाला सुरुवात झाली आहे. या श्लोकात चार मुद्दे आहेत. १-कर्म करणं आपल्या हातात आहे. २-फळ मिळणं आपल्या हातात नाही. ३-म्हणून फळावरच लक्ष ठेवून कर्म करू नये. आणि ४-परिणामांच्या भयाने कर्म टाळण्याचा विचारही करू नये.

हा एकूण विषय खूप व्यापक आहे. संदर्भासहित खुलासा कारायला जावं तितकं अधिक गुंत्यात अडकायला होतं. म्हणून अगदी थोडक्यात सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

आपल्या रोजच्या जगण्यात हा श्लोक सतत मार्गदर्शन करून परिणामाच्या भयातून आपली सुटका करू शकतो. सध्याचेच उदाहरण घेऊ. हल्ली करोना संसर्गापासून बचावण्यासाठी कोणतीही वस्तू बाहेरून घरात आली तर ती जागेवर ठेवण्यापूर्वी घ्यायला हवी ती सर्व खबरदारी घेतली तरी धास्ती टोकतच राहते. अशावेळी हा श्लोक आठवला तर स्वतःला समजावता येतं की घ्यायची ती सगळी काळजी घेतलीय. जे हातात आहे ते केलंय. सर्व काळजी घेऊनही काय होईल ते माझ्या हातात नाही. त्याच्या विचारात मी अडकू नये...

थोडक्यात, आपल्या विचारांचा फोकस समोर असलेलं काम करण्यावर, जे हातात आहे ते करण्यावर केंद्रित करायचं. आपली क्षमता कामाच्या परिणामांचा विचार करण्यात खर्च करायची नाही. पोखरणाऱ्या काळजीचा अंकुश नसेल तर पूर्ण लक्ष घालून, सर्व क्षमता वापरून काम करता येईल. ते करताना त्या प्रक्रियेचाच आनंद घेता आला तर काम पूर्ण होईपर्यंतचा आनंद, समाधान आधीच जमेस येईल. परिणामांच्या विचारात गुंतून न पडणं म्हणजे त्यांच्या भयातून सुटका. जगताना प्रत्येक कामात मिळणारी अशी सुटका म्हणजे त्या त्यावेळची मुक्तीच..! (अर्थात हेही सहज साध्य नाहीच..)

मी व्यक्तिशः या जन्मातल्या अशा मुक्तींचाच विचार करते. या जन्मात केलेल्या कर्मांची फळं भोगण्यासाठी पुन्हा पुन्हा जन्म घ्यावे लागतात.. हे मला पटत नाही त्यामुळे त्यातून सुटका करणाऱ्या मुक्तीचा विचार मी करत नाही.

६.७.२०२०

***

## भाग ८

‘कर्मण्येवाधिकारस्ते...’ या श्लोकातील उपदेश आचरणात आणायचा तर समत्व-बुद्धीने कर्म करता यायला हवं. म्हणजे अपेक्षित फळ लाभो न लाभो दोन्हीकडे सम भावनेनं बघता यायला हवं. त्यासाठी हे माझं आहे, मी करतो आहे या भावनेतून बाजूला होऊन निःसंग होता यायला हवं. ही एक भावनिक कसरतच आहे. कर्म करण्यातलं हे कौशल्य म्हणजेच कर्मयोग.

कर्मयोगासाठी आवश्यक अशी समत्वबुद्धी म्हणजे ‘स्थितप्रज्ञ’ अवस्था. या पुढील श्लोकांमधे स्थितप्रज्ञ व्यक्ती कशी असते त्याचं वर्णन आहे. त्यातील दोन श्लोक आज विचारात घेतले आहेत.

गीता-

क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ।
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ।।२/६३।।

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ।।२/६९।।

गीताई-

क्रोधातुनी जडे मोह मोहाने स्मृति लोपली
स्मृति-लोपे बुद्धि-नाश म्हणजे आत्म-नाश चि ।।२/६३।।

सर्व भूतास जी रात्र जागतो संयमी तिथे
सर्व भूतें जिथें जागीं ज्ञानी योग्यास रात्र ती ।।२/६९।।

ज्ञानेश्वरी-

२/६३-

जेथ कामु उपजला । तेथ क्रोधु आधीचि आला । क्रोधी असे ठेविला । संमोह जाणे ।।२/३२२
संमोहा जालिया व्यक्ति । तरी नाशु पावे स्मृति । चंडवाते* ज्योति । आहत जैसी ।। २/३२३
ऐसा स्मृतिभ्रंशु घडे । मग सर्वथा बुद्धी अवघडे । तेथ समूळ हे उपडे । ज्ञानजात ।।२/३२७

(*चंडवात म्हणजे सोसाट्याचा वारा) (ज्ञानेश्वरीत गीतेतील ६२,६३ या दोन श्लोकांसाठी दहा ओव्या आहेत. त्यातल्या तीन इथे दिल्या आहेत.)

२/६९-
देखे भूतजात निदेले । तेथेचि जया पाहले । आणि जीव जेथे चेईले । तेथ निद्रित जो ।। २/३५५
तोचि तो निरुपाधि । अर्जुना तो स्थिरबुद्धी । तोचि जाणे निरवधि । मुनीश्वर ।। २/३५६

सरळ अर्थ-

२/६३- (आधीच्या- २/६२ या श्लोकात म्हटलंय- विषयाचे चिंतन करणाऱ्या व्यक्तीला त्याविषयी आसक्ती निर्माण होते. त्यातून लालसा आणि त्याची प्राप्ती झाली नाही की क्रोध उत्पन्न होतो) क्रोधामुळे अविवेक (संमोह) निर्माण होतो. अविवेकामुळे स्मृतीभ्रंश (कर्तव्याविषयीचा). स्मृतीभ्रंशामुळे बुद्धी नष्ट होते. बुद्धी नष्ट होणं म्हणजे सर्वनाशाच..!

२/६९- सर्व प्राणिमात्रांसाठी जेव्हा रात्र असते तेव्हा संयमी स्थितप्रज्ञ जागृत असतो आणि प्राणिमात्रांचा दिवस सुरू होतो तेव्हा स्थितप्रज्ञासाठी ती रात्र असते.

अर्थविस्तार-

हे दोन श्लोक म्हणजे स्थितप्रज्ञ अवस्था प्राप्त होण्याच्या प्रक्रियेतील दोन टप्पे आहेत. पहिल्या श्लोकात साधकाच्या स्थितप्रज्ञपूर्व अवस्थेचं वर्णन आहे. 'मी, माझं' या भावनेतून बाजूला झाल्याशिवाय समत्वबुद्धी प्राप्त होत नाही. कर्म करताना असं निःसंग व्हायचं तर दृढनिश्चयाने इंद्रियांवर ताबा मिळवावा लागतो. साधक निग्रहपूर्वक विषयांपासून मन आवरण्याचा प्रयत्न करतो. पण इंद्रिये मनावर कुरघोडी करून विषयांच्या मागे धावत राहतात. 'त्यास रोधूनि युक्तीने रहावे मत्परायण..' असा उपाय कृष्णाने यावर सुचवला आहे. 'मत्परायण' म्हणजे ईश्वरभक्ती. मन ईश्वरभक्तीत रममाण झाले की त्याची विषयभोगातील रुचीच नाहीशी होते आणि बुद्धी स्थिर व्हायला मदत होते.

पण हे प्रयत्न जरा जरी ढिले पडले तरी एकातून एक करत सर्वनाशापर्यंत कशी घसरण होते ते सांगितले आहे. परत परत मनात डोकावणारा विषयांचा विचार- त्यातून आसक्ती- लालसा- ती शमली नाही की क्रोध- क्रोध अनावर झाला की अविवेक- त्यातून स्मृतीभ्रंश.. स्मृतीभ्रंश झाला की निश्चयात्मक बुद्धी नष्ट होते. आणि बुद्धीनाश म्हणजे सर्वनाशच..!

हा सर्वनाश टाळायचा असेल तर या कारणपरंपरेतील काम-क्रोध हे प्रमुख दोष आगोदर नाहीसे करण्याची आवश्यकता आहे. जेव्हा हे साध्य होते तेव्हा इंद्रिये पूर्णपणे स्वाधीन होतात. अशा शुद्ध अंतःकरणाच्या माणसालाच स्थिर बुद्धी प्राप्त होते. आजच्या दुसऱ्या श्लोकात अशा माणसाचे वर्णन आहे. समत्वबुद्धी प्राप्त झालेला माणूस विवेकी असल्यामुळे तो दुःखाविषयी निर्भय आणि सुखाविषयी निःस्पृह असतो. त्यातून त्याच्या मनाला

प्रसन्नता लाभते आणि तो शांतचित्त होतो. सर्वसामान्यांसाठी जेव्हा रात्र असते तेव्हा संयमी स्थितप्रज्ञ जागृत असतो आणि प्राणिमात्रांचा दिवस सुरू होतो तेव्हा ज्ञानी योग्यासाठी ती रात्र असते. म्हणजे ज्या लौकिक गोष्टींबाबत सामान्य माणूस अत्यंत सजग असतो त्या बाबातीत स्थितप्रज्ञ अलिप्त असतो आणि ज्या आत्मज्ञानाकडे सामान्य माणूस डोळेझाक करतो त्या विषयात स्थितप्रज्ञ सदैव जागृत असतो... आत्मज्ञानामुळे अहंता.. ममता या वृत्ती नाहीशा होऊन तो पूर्णतः निःस्पृह होतो. सिद्धावस्था प्राप्त करतो.

अशी समत्वबुद्धी प्राप्त करणं आपल्यासारख्या सामान्य माणसाला अशक्य तर वाटतंच. पण कशाचंच काही न वाटणारा गीतेतला स्थितप्रज्ञ आपल्याला रुक्षही वाटू शकेल. मात्र ज्ञानेश्वरीत स्थितप्रज्ञाचं प्रेमात पडावं असं प्रसन्न चित्र उभं केलं आहे. त्यातल्या शेवटच्या दोन ओव्या--

ऐसा आत्मबोधे तोषला । जो परमानंदे पोखला । तोचि स्थितप्रज्ञु भला । वोळख तू ।।२/३६६
तो अहंकाराते दंडुनी । सकळ कामु सांडोनी । विचरे विश्व होऊनि । विश्वाचि माजी ।।२/३६७

ज्ञानेश्वरांनी साकारलेला हा स्थितप्रज्ञ 'हे माझं नाही' असं म्हणून निःसंग होण्याऐवजी 'अवघं विश्व मी'च आहे या धारणेनं मीपणाचा छोटा परीघ लंघून विश्वात वावरणारा आहे.. सामान्य व्यवहारी जगाकडे पाठ फिरवणारा नाही तर त्यात मिसळणारा आहे..! (अर्थात हे गीतेच्या विरोधी नाही. हा फक्त सांगण्याच्या शैलीतला फरक आहे.)

१३.७.२०२०

***

## भाग ९

गीतेच्या दुसऱ्या अध्यायात गीतेच्या एकूण तत्त्वज्ञानातील सर्व विषयांचे सूतोवाच केलेले आहे. तत्त्वज्ञानातील कोणत्याही शास्त्रीय सिद्धान्ताचे स्वरूप तात्त्विक आणि व्यावहारिक अशा दोन स्तरांवर समजून घ्यावे लागते. यापैकी तात्त्विक स्वरूपाचे विवेचन दुसऱ्या अध्यायात आले आहे. ते अर्जुनाला चांगलेच पटले होते. पण, 'कर्म करणेच फक्त तुझ्या हातात आहे, समत्वबुद्धीने तू ते कर' हा उपदेश अनुसरून युद्धासारखे भयंकर कर्म करण्याची त्याच्या मनाची तयारी होत नव्हती. त्यामुळे 'बुद्धी कर्माहुनी थोर मानिसी तू जनार्दना। मग कर्मात का घोर घालिसी मज केशवा?' असा प्रश्न तो कृष्णाला विचारतो.

तिसऱ्या अध्यायाची सुरुवात या प्रश्नानेच झाली आहे. या प्रश्नाच्या निमित्ताने कर्मयोग सिद्धान्ताच्या व्यावहारिक स्वरूपाचे विवेचन या अध्यायात आले आहे. या विवेचनाच्या शेवटी शेवटी आलेला एक सर्वश्रुत आणि महत्त्वाचा श्लोक आज विचारात घेतला आहे.

गीता-

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥३/३५ ॥

गीताई-

उणा हि आपुला धर्म पर-धर्माहुनी बरा
स्व-धर्मांत भला मृत्यु पर-धर्म भयंकर ॥३/३५॥

ज्ञानेश्वरी-

अगा स्वधर्मु हा आपुला । जरी का कठिणु जाहला । तरी हाचि अनुष्ठिला । भला देखे ॥३/२१९
येरु आचारु जो परावा । तो देखता कीर बरवा । परी आचरतेनि आचरावा । आपुलाचि ॥ ३/२२०

सरळ अर्थ-

स्वधर्म आचरताना त्यात काही न्यून जाणवले तरी दुसऱ्याच्या धर्माहून तोच बरा.
आपल्या धर्मात मृत्यु आला तरी चालेल पण पर-धर्म आचरणे भयंकर..!

अर्थविस्तार-

या श्लोकात कर्माचरणाच्या संदर्भात आलेली 'स्वधर्म' ही संकल्पना काहीशी गुंतागुंतीची

आहे. तिचे वेगवेगळे अर्थ लावता येतील. पण गीतेत 'स्वधर्म' म्हणजे काय अभिप्रेत आहे? ते समजून घेण्यासाठी या श्लोकाच्या आधीचे श्लोक पाहणे आवश्यक आहे...

तिसऱ्या अध्यायाच्या सुरुवातीला आलेल्या 'मग कर्मात का घोर घालीसी मज केशवा?' या अर्जुनाच्या प्रश्नाला उत्तर देताना कृष्णाने कर्माची व्याप्ती आणि गरज समजावून सांगितली आहे. जन्माला आल्यावर सुरू होणारे देहाचे व्यापार कुणी रोखू शकत नाही. प्रकृतीच्या गुणांमुळे माणसाकडून कर्मे होतच राहतात. सृष्टीचक्र चालू राहण्यासाठीही माणसाने कर्म करत राहणे गरजेचे आहे. कर्माचरणामुळे मोक्षमार्गात अडथळे निर्माण होतील का असा संभ्रम निर्माण होतो. पण कर्म करताना केवळ स्वतःचा विचार करून चालत नाही. समष्टीचाही विचार करणे आवश्यक असते. म्हणून मनासह ज्ञानेंद्रियांचे नियमन करून शुद्धबुद्धीने कर्मेंद्रियांनी प्राप्तकर्म करत राहावे.

प्राप्तकर्म म्हणजे कोणते कर्म? प्रत्येक माणसात सत्व रज तम या तिन्ही गुणांचं विशिष्ठ मिश्रण असतं. त्यांच्या प्रमाणानुसार त्याची प्रकृती, स्वभाव घडत असतो. स्वधर्म म्हणजे त्रिगुणांनी घडवलेल्या आपल्या प्रकृतिस्वभावानुसार प्राप्त असलेले कर्तव्य. परधर्म म्हणजे दुसऱ्याच्या प्रकृतिस्वभावानुसार त्याला प्राप्त असलेले कर्तव्य. हा स्वधर्म आचरताना त्यात काही न्यून जाणवले तरी दुसऱ्याच्या धर्माहून तोच बरा. आपल्या धर्मात मृत्यु आला तरी चालेल पण पर-धर्म आचरणे भयंकर..!

इथे ज्याला हा उपदेश केला जात आहे त्या अर्जुनाची स्वभावतः क्षात्रवृत्ती आहे आणि तो ती सोडून संन्यास घ्यायला निघाला आहे. तर त्याने तसे करणे योग्य नाही. स्वधर्मानुसार त्याने युद्धाला सज्ज व्हावे असे कृष्ण सांगतो आहे.

आपल्या सामान्य जगण्याच्या पातळीवरही आपण मुलांचा कल, वृत्ती, क्षमता पाहून शिक्षण देतो. द्यायला हवे. दुसरा एखादा अभ्यासक्रम कितीही चांगला, फायद्याचा असला तरी तो त्याच्यासाठी श्रेयस्कर ठरत नाही.

इथे प्रश्न पडू शकतो की एखाद्याची वृत्तीच हीन दर्जाची असेल तर त्याने त्यानुसारच वर्तन करावे काय? अशा स्वधर्मातला मृत्युही बरा पण त्याने चांगल्या परधर्माचा अंगीकार करणे भयंकर कसे? कदाचित असा प्रश्न पडणं म्हणजे कवितेतली प्रतिमा ताणण्यासारखं होईल... आपण तात्पर्य लक्षात घ्यावे.

२०.७.२०२०

***

## भाग १०

तिसऱ्या अध्यायात कर्मयोगाचे महत्त्व, स्वरूप आणि सृष्टीचक्र चालू राहावे म्हणून प्रत्येक व्यक्तीने कोणते कर्म, कसे करावे ते समजून सांगितले आहे. यात कर्म म्हणजे यज्ञकर्म असा उल्लेख असला तरी यज्ञ म्हणजे केवळ होम हवन नाही. उपासाना म्हणून केलेले कोणतेही कर्म यज्ञकर्मच असते. या उपासनेच्या स्वरूपाचे विस्तृत विवेचन आणि निःसंग उपासनामय बुद्धीचे स्पष्टीकरण हा चौथ्या अध्यायाचा विषय आहे. या अध्यायातील सुरुवातीचे दोन सर्वपरिचित श्लोक आज विचारात घेतले आहेत.

गीता-

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।।४/७।।

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।।४/८।।

गीताई-

गळूनि जातसे धर्म ज्या ज्या वेळेस अर्जुना
अधर्म उठतो भारी तेव्हां मी जन्म घेतसें ।।४/७।।

राखावया जगी संतां दुष्टां दूर करावया
स्थापावया पुन्हां धर्म जन्मतों मी युगीं युगीं ।।४/८।।

ज्ञानेश्वरी-

गीता ४/७- जे धर्मजात आघवे । युगायुगी म्या रक्षावे । ऐसा ओघु हा स्वभावे । आद्य असे ।।
४/४९ म्हणोनि अजत्व परते ठेवी । मी अव्यक्तपणही नाठवी । जे वेळी धर्माते अभिभवी । अधर्मु हा ।।४/५०
गीता ४/८- दैत्यांची कुळे नाशी । साधुंचा मानु गिंवशी । धर्मासी नीतीशी । शेज भरी ।।
४/५३
ऐसेया काजालागी । अवतरे मी युगी युगी । परि हेचि वोळखे जो जगी । तो विवेकिया ।।४/५७

(आठव्या श्लोकासाठी ज्ञानेश्वरीत सात ओव्या आहेत. त्यातल्या दोन इथं दिल्या आहेत.)

सरळ अर्थ-

जेव्हा जेव्हा (उपासनात्मक) धर्म निस्तेज होतो आणि अधर्म (नास्तिकता) वाढतो तेव्हा तेव्हा मी स्वतःला उत्पन्न करत असतो.

सज्जनांचे रक्षण करण्यासाठी आणि दुष्टांचे निर्दालन करून धर्माची पुन्हा स्थापना करण्यासाठी मी वेळोवेळी प्रगट होतो.

अर्थविस्तार-

चौथ्या अध्यायाच्या सुरुवातीला कृष्णानं म्हटलंय, 'अर्जुना, त्रिकालाबाधित असा हा कर्मयोग मी सूर्याला सांगितला, सूर्याने मनूला सांगितला व मनूने इश्वाकूला सांगितला... ह्याप्रमाणे परंपरेने चालत आलेला हा कर्मयोग राजे व ऋषी जाणत होते. पण दीर्घकालानंतर तो लुप्त झाला. तोच सनातन कर्मयोग आज मी तुला सांगितला आहे.'

यावर अर्जुन विचारतो, 'सूर्याचा जन्म कितीतरी प्राचीन आणि तू आताचा... मग तूच प्रथम हा योग सूर्याला सांगितलास हे मला कसे समजावे?'

या प्रश्नाच्या उत्तरात आजचे दोन्ही श्लोक येतात. कृष्ण म्हणतो, 'मी अजन्मा आहे. पण माझे हे अजत्व बाजूला ठेवून जेव्हा जेव्हा (उपासनात्मक) धर्म निस्तेज होतो आणि अधर्म (नास्तिकता) वाढतो तेव्हा सज्जनांचे रक्षण करण्यासाठी आणि दुष्टांचे निर्दालन करून धर्माची पुन्हा स्थापना करण्यासाठी स्वतःला उत्पन्न करून मी वेळोवेळी प्रगट होत असतो.'

इथे धर्म म्हणजे कर्मकांडात्मक धर्म. शुद्ध उपासनाबुद्धीने (पूजाभाव, निःस्वार्थता) केली जाणारी कर्मकांडे. पुराणकाळात यज्ञयाग करून पंचमहाभूतांच्या देवतांना प्रसन्न करून सृष्टीचक्र चालू ठेवण्याचे, पुढील पिढीला ज्ञानदान करण्याचे कार्य ऋषी-मुनीं करत असत. राज्यात त्यांना मान असे. राजेही त्यांच्या आज्ञेत असत. पण कलौघात हे संतूलन ढळून उन्मत्त राजे, राक्षस त्यांना त्रास देऊ लागत. त्यांचे कार्य बंद पडू लागले की हळूहळू नीतीमूल्ये ऱ्हास पावू लागत. अशा प्रत्येक वेळी विष्णुने वेगवेगळ्या रूपात अवतार घेऊन दुष्टांचा संहार करून धर्माची पुनर्स्थापना केल्याच्या कथा आपण लहानपणापासून ऐकलेल्या असतात. अलिकडे पुन्हा दाखवल्या गेलेल्या 'विष्णूपुराण' या दूरदर्शन मालिकेत मनू या पहिल्या मानवापासूनचा कथाभाग दाखवला होता.

अवतारांविषयीच्या या पुराणकथांचा अन्वयार्थ वैज्ञानिक आणि काव्यात्म पातळीवर लावला जातो. इतिहासातही आपण वेळोवेळी लोकोत्तर माणसांचे मानवाला तारणारे कार्य

वाचलेले आहे. अन्वयार्थ काही असला तरी या श्लोकांचा जनमानसाला नकळत आधार वाटत आला आहे.

२७.७.२०२०

***

# भाग ११

चौथ्या अध्यायात 'ज्ञानकर्मसंन्यासयोग' म्हणजे अलिप्त राहून शुद्धबुद्धीने कर्म कसे करावे ते सांगितले आहे. या सृष्टीचे आपण अविभाज्य घटक असतो. आणि सृष्टीचक्र चालू राहावे म्हणून आपल्या प्रत्येकाला काही काम वाटून दिलेले असते. हे समजून घेऊन त्या उद्देशाने ते काम कर्तव्यबुद्धीने करावे. कसे ते समजावण्यासाठी कृष्णाने स्वतःचेच उदाहरण दिलेले आहे. म्हटले आहे- 'मी अजन्मा आहे. पण माझे हे अजत्व बाजूला ठेवून जेव्हा जेव्हा उपासनात्मक धर्म निस्तेज होतो आणि नास्तिकता, अधर्म वाढतो तेव्हा सज्जनांचे रक्षण करण्यासाठी आणि दुष्टांचे निर्दालन करून धर्माची पुन्हा स्थापना करण्यासाठी स्वतःला उत्पन्न करून मी वेळोवेळी प्रगट होत असतो.'

धर्माची पुन्हा स्थापना करण्यासाठी मी काय करतो आणि तरी अकर्ता कसा राहतो हे सांगणारा श्लोक आज विचारात घेतला आहे. कर्म कसे करावे हे सांगण्याच्या संदर्भात आलेला हा श्लोक सामाजिक दृष्टीने अधिक चर्चेत येत राहिला आहे.

गीता

चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः ।
तस्य कर्तारमपि मां विद्ध्यकर्तारमव्ययम् ।।४/१३।।

गीताई-

निर्मिले वर्ण मी चारी गुण-कर्में विभागुनी
करूनि सर्व हें जाण अकर्ता निर्विकार मी ।।४/१३।।

ज्ञानेश्वरी-

आता याचिपरी जाण । चाऱ्ही आहेती हे वर्ण । सृजिले म्या गुण- । कर्मभागे ।। ४/७७
म्हणोनि आईके पार्था । हे वर्णभेद संस्था । मी कर्ता नव्हे सर्वथा । याचिलागी ।। ४/८०

सरळ अर्थ-

चार वर्णांची व्यवस्था मी गुण-कर्मांच्या विभागावरून केलेली आहे. मी या कर्माचा कर्ता असलो तरी, (पर्मार्थतः) मी अव्यय आणि अकर्ता आहे असे जाण.

अर्थविस्तार-

चार वर्ण म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र. माणसांची अशी विभागणी जन्माने किंवा ईश्वराच्या मर्जीनुसार झालेली नाही. गुण-कर्मांच्या विभागानुसार झालेली आहे. गुण म्हणजे त्रिगुण- सत्व रज तम. प्रत्येक व्यक्तीची वृत्ती या तीन गुणांच्या विशिष्ठ मिश्रणाचा परिणाम असते. या वृत्तीनुसार त्याच्या हातून कर्मे होतात आणि या वृत्ती-कर्मानुसार हे वर्ण ठरतात.. मी या कर्माचा कर्ता असलो तरी पर्मार्थतः मी अकर्ता आहे.

अखिल विश्वातील सर्व घडामोडींचे व्यवस्थापन करणारी एक योजना असते. तिला ऋत असे संबोधले आहे. या श्लोकाच्या निमित्ताने वेदकाळातील ही संकल्पना समजून घ्यायला हरकत नाही. कुणाच्या वाचनात या विषयी काही आलं असेल तर अवश्य शेअर करावं.

समाजातील अशी श्रमविभागणी संकल्पनात्मक पातळीवर आदर्श असू शकेल. पण प्रत्यक्षातल्या अनुभवावरून या विवेचनातील 'वर्ण जन्मानुसार ठरत नाहीत' हा मुद्दा पटण्यासारखा नाही. गीता सांगितली गेली त्या काळातलं कर्णाचं ठळक उदाहरण आपल्यासमोर आहे. गुण-कर्मांनी सर्व निकषांवर क्षत्रिय ठरू शकत असूनही सूतपुत्र म्हणून त्याला हिणवलं, डावललं गेलं. त्याचा वर्ण कोणत्या गुण-कर्मांवरून ठरला?

आजतागायत या वर्ण-विभागणीमुळे सामाजिक विषमता, विव्देष, क्रूर अत्याचार होत आहेत. गीतेसारख्या ग्रंथात या श्लोकाच्या आधारे चातुर्वर्ण पद्धतीला समर्थन शोधलं जातं... पण हे विषयांतर होऊ शकेल. मुळात हा श्लोक गीतेत आला आहे तो कर्म शुद्धबुद्धीने कसे करावे त्याचे उदाहरण म्हणून..!

३.८.२०२०

***

## भाग १२

'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं..' हे स्वतःचे उदाहरण देऊन, कर्म अलिप्तपणे व कर्तव्यबुद्धीने केल्यामुळे कर्मबंधनातून कसे मुक्त राहता येते ते सांगितल्यावर पुढे कर्म, अकर्म (कर्मशून्यत्व), विकर्म (निषिद्ध कर्म), ज्ञानोपासना आणि ज्ञानमय कर्म याविषयीचे विवेचन विस्ताराने आले आहे... या पार्श्वभूमीवर ज्ञान, श्रद्धा, आणि संशय या संदर्भात आलेले तीन श्लोक आज विचारात घेतले आहेत. त्यातील ओळी वचनरूपात सर्वांना परिचित आहेत...

गीता-

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।
तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मनि विन्दति ।।४/३८।।

श्रद्धावाँल्लभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियः ।
ज्ञानं लब्ध्वा परां शान्तिमचिरेणाधिगच्छति ।।४/३९।।

अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति ।
नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः ।।४/४०।।

गीताई-

ज्ञानासम नसे कांहीं पवित्र दुसरे जगीं
योग-युक्त यथा-काळीं तें पावे अंतरी स्वयें ।।४/३८ ।।

श्रद्धेनें मेळवी ज्ञान संयमी नित्य-सावध
ज्ञानानें शीघ्र तो पावे शांती शेंवटची मग ।।४/३९ ।।

नसे ज्ञान नसे श्रद्धा संशयी नासला पुरा
न हा लोक न तो लोक न पावे सुख संशयी ।।४/४०।।

## ज्ञानेश्वरी-

४/३८- येथ ज्ञान हे उत्तम होये । आणिकही एक तैसे के आहे । जैसे चैतन्य का नोहे । दुसरे गा ।। ४/१७९

४/३९- जो मनासी चाड न सांगे । जो प्रकृतीचे केले नेघे । जो श्रद्धेचेनी संभोगे । सुखिया जाहला ।।४/१८८ ते ज्ञान हृदयी प्रतिष्ठे । आणि शांतीचा अंकुर फुटे । मग विस्तार बहु प्रकटे । आत्मबोधाचा ४/१९०

४/४०- ऐके जया प्राणियाचा ठायी । इया ज्ञानाची आवडी नाही । तयाचे जियाले म्हणो काई । वरी मरण चांग ४/१९३ मग संशयी जरी पडला । तरी निभ्रांत जाणे नासला । तो ऐहिकपरत्रा मुकला । सुखासि गा ।। ४/१९९

## सरळ अर्थ-

या जगात ज्ञानासारखे पवित्र दुसरे काही नाही. ते ज्ञान स्थितप्रज्ञ कर्मयोगी योग्य कालाने स्वतःच्या ठिकाणी स्वतःच मिळवतो.

श्रद्धावान, जितेंद्रिय व ज्ञानाची उत्कंठा असलेल्या माणसालाच हे ज्ञान प्राप्त होते. व ज्ञान मिळाल्यावर पूर्ण शांती मिळते.

अज्ञ, श्रद्धाहीन व संशयखोर मनुष्याला ना इहलोक ना परलोक, कोणतेच सुख मिळत नाही.

## अर्थविस्तार-

४/३८- या श्लोकाच्या पहिल्या ओळीत आलेलं, ज्ञानाचं महत्त्व सांगणारं 'जगात ज्ञानासारखं पवित्र दुसरं काही नाही' हे वचन आपण लहानपणापासून वाचत, ऐकत आलो आहे. त्याचा प्रत्यय सतत घेत आलो आहे. कोणतंही साधं काम करतानाही त्या विषयीचे पूर्ण ज्ञान असल्याशिवाय ते काम उत्तम रीतीने करता येत नाही. हे व्यवहारी ज्ञान त्या कामासाठी पुरेसे असते. पण मानवी जीवनाचे अंतिम प्राप्तव्य असलेल्या मोक्षप्राप्तीसाठी परमात्मज्ञान होणे आवश्यक असते. कर्मयोगाचे महत्त्व अधोरेखित करणारी या श्लोकाची दुसरी ओळ तितकीच महत्त्वाची आहे. या ओळीत म्हटलं आहे, ते परमात्मज्ञान स्थितप्रज्ञ कर्मयोगी योग्य कालाने स्वतःच्या ठिकाणी स्वतःच मिळवतो. म्हणजे ते मिळवण्यासाठी त्याला गुरूकरता अडून राहावे लागत नाही. कर्मयोगाच्या उपासनेतच त्याला ते ज्ञान मिळते.

४/३९,४०- श्रद्धा, ज्ञानाची उत्कंठा आणि आत्मसंयम या गोष्टी ज्ञानप्राप्तीसाठी आणि

कर्मयोग साधण्यासाठी आवश्यक आहेत. ज्याला हे साधते त्याला परमशांती लाभते. पण अज्ञ, श्रद्धाहीन व संशयखोर मनुष्य स्वतःचा नाश ओढवून घेतो. त्याला ना इहलोक ना परलोक.. कोणतेच सुख मिळत नाही. सामान्य, व्यवहारी जीवनातही संशयी वृत्तीने काहीही साध्य होत नाही. श्रद्धा आणि ज्ञानप्राप्तीमुळेच माणसाला खरे सुख आणि शांती लाभते.

१०.८.२०२०

***

## भाग १३

'गीता आणि आपण' या उपक्रमात गीतेतले, वेगवेगळ्या संदर्भात ऐकून, वाचून सर्वपरिचित झालेले फक्त २५-२६ श्लोकच आपण विचारार्थ घेतले आहेत. त्यातला एकेक श्लोक समजून घेताना गीतेच्या एकूण विवेचनातील कोणत्या संदर्भात तो आला आहे तेही जाणून घ्यावे लागते. दोन श्लोकातील अंतर जेवढे जास्त तेवढा आशयविस्तार ओलांडून पुढच्या श्लोकाला भिडावे लागते...

ज्ञान, श्रद्धा, आणि संशय या विषयी आलेल्या श्लोकांमधून ज्ञानप्राप्तीचे महत्त्व सांगून चौथ्या अध्यायाची सांगता केली आहे. पाचव्या अध्यायात कर्मयोगाचे महत्त्व अधोरेखित केल्यावर आता त्यासाठी आवश्यक असलेल्या साम्ययोगाविषयीचे (समत्वबुद्धी) विवेचन सहाव्या अध्यायात आले आहे. त्यातला पाचवा श्लोक आज विचारात घेतला आहे.

गीता-

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।
आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मनः ।।६/५।।

गीताई-

उद्धरावा स्वयें आत्मा खचूं देऊं नये कधीं
आत्मा चि आपुला बंधु आत्मा चि रिपु आपुला ।।६/५।।

ज्ञानेश्वरी-

तव हासोनी कृष्ण म्हणे । तुझे नवल ना हे बोलणे । कवणासी काय दिजेल कवणे । येथ अव्दैती इये ।।६/६७।। म्हणऊनि आपणचि आपणपेया । घातु किजतु असे धनंजया । चित्त देऊनि नाथिलीया । देहाभिमाना ।।६/७०।।

सरळ अर्थ-

माणसाने स्वतःच स्वतःचा उद्धार करावा. स्वतःला अधोगतीस नेऊ नये. कारण माणूस आपणच आपला बंधु (हितकर्ता) व आपणच आपला शत्रु (अहितकर्ता) असतो .

अर्थविस्तार-

कर्ममार्ग असो की ज्ञानमार्ग असो, करत असलेल्या साधनेच्या फलांच्या... परिणामांच्या विचारात न गुंतणे महत्त्वाचे आहे. दोन्ही मार्गात 'फल'संन्यास आवश्यक आहे. आणि

त्यासाठी विषयवासनांवर नियंत्रण असणे आवश्यक आहे. वरकरणी कर्मत्याग करूनही जर मन विषयवासनांमधे रमले तर तो मनुष्य संन्यासीही नाही आणि कर्मयोगीही नाही. आत्मोन्नती संपादन करणे हे माणूस म्हणून प्रत्येकाचे कर्तव्य आहे. ही आत्मोन्नती दुसऱ्या कुणाकडून होऊ शकत नाही, ती आपली आपणच साधायची असते. माणसाला त्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते. मनुष्य आपणच आपला हितकर्ता बंधू असतो आणि स्वतःचा अधःपात करणारा शत्रूही होऊ शकतो. म्हणून मनुष्याने जाणीवपूर्वक स्वतःचा उद्धार करावा. स्वतःला अधोगतीच्या मार्गाकडे नेऊ नये.

व्यवहारातील आत्महत्येच्या गुन्ह्याप्रमाणे परमार्थात आपली बौद्धिक अवनती करणे हे पाप असून ते कोणीही करू नये. प्रत्येकाने आपली आध्यात्मिक उन्नती करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हा उपदेश केवळ आध्यात्मिक साधना करणाऱ्या साधकांपुरता मर्यादित नाही. आपल्या सर्वांसाठी आहे. सामान्य जगणं स्वतःला आणि स्वतःभोवतीच्या सर्वांना सुखकारक व्हावं म्हणून प्रत्येकानं अधिक प्रगल्भ, समंजस आणि विवेकी होणं गरजेचं असतं. किमान एवढी आत्मोन्नती करून घ्यायला हवी. आणि ते आपल्याच हातात आहे...

१७.८.२०२०

***

## भाग १४

सहाव्या अध्यायात ज्ञानोपासनेचे महत्त्व आणि कर्मयोगासाठी आवश्यक असलेला इंद्रियनिग्रह संपादन करण्याचे मार्ग सांगितले आहेत. सातव्या अध्यायात व्यक्त आणि अव्यक्त उपासनेचे विस्तृत विवेचन आले असून त्याचेच अधिक सूक्ष्म विश्लेषण आठव्या अध्यायात केलेले आहे. नवव्या अध्यायात हाच विषय पुढे नेला असला तरी यात भक्तीमार्गाचे विवेचन विस्ताराने केले आहे. प्रेम, श्रद्धा व भक्ती हे ईश्वरोपासनेचे मूलाधार आहेत. हे सांगणारा एक सर्वपरिचित श्लोक आज विचारात घेतला आहे.

गीता-

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।
तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ।।९/२६।।

गीताई-

पत्र वा पुष्प जो प्रेमें फळ वा जळ दे मज
तें त्या पवित्र भक्ताचें अर्पिले खाय मी सुखें ।।९/२६।।

ज्ञानेश्वरी-

पै भक्ती एकी मी जाणे । तेथ साने थोर न म्हणे । आम्ही भावाचे पाहुणे । भलतेया ।।९/३९५
येर पत्र पुष्प फळ । ते भजावया मिस* केवळ । वाचुनी आमुचा लाग* निष्कळ* । भक्तितत्त्व ।।९/३९६

* मिस- निमित्त, लाग- आवड, निष्कळ- कर्मकांडाचे कोणतेही अवडंबर नसणारे..

सरळ अर्थ-

जो कोणी भक्तीने मला (ईश्वराला) पान, फूल, फळ, पाणी असे काहीही अर्पण करतो ते शुद्ध अंतःकरणाने भक्तीपूर्वक अर्पण केलेले मी आनंदाने ग्रहण करतो.

अर्थविस्तार-

परमेश्वराचे यथार्थ ज्ञान, शुद्धबुद्धीने केलेली अनन्य भक्ती, मनासह सर्व इंद्रियांवर नियंत्रण हीच परमेश्वराच्या निष्काम उपासनेची सामग्री आहे आणि स्वकर्तव्यनिष्ठा म्हणजे कर्मयोग हीच त्या उपासनेची पद्धत आहे. बाकी कोणत्याही कर्मकांडांचे अवडंबर अनावश्यक आहे.

एखादा भक्त पूजाविधी म्हणून शुद्ध अंतःकरणाने भक्तीपूर्वक पान, फूल, फळ, पाणी असे काहीही अर्पण करतो ते ईश्वराप्रत पोहोचतेच. काय अर्पण केले यापेक्षा कसे, कोणत्या भावनेने केले हे महत्त्वाचे आहे. वेगवेगळ्या देवतांना प्रसन्न करण्यासाठी केल्या जाणाऱ्या यज्ञविधींमधल्या अतिरिक्त कर्मकांडांचे वैयर्थ या श्लोकात अधोरेखित झाले आहे. पूजासाहित्य आणि पूजाविधी ही भक्तीची केवळ दृश्य साधने आहेत.

याच्या पुढील श्लोकात तर म्हटलं आहे की वेगळी पूजा करण्याचीही गरज नाही. शुद्धबुद्धीने जे जे कर्तव्यकर्म कराल तेच मला अर्पण करा. ज्ञानेश्वरीत या संदर्भात एक सुंदर ओवी आहे-
तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्मकुसुमांची वीरा* । पूजा केली होय अपारा । तोषालागी ।।
१८/९१७ (*वीरा- वीर अर्जुना,)

यातून एक व्यापक विचार सूचित होतो आहे. ऋग्वेदात ऋत अशी एक संकल्पना आहे. ऋत म्हणजे विश्वाची सुव्यवस्था आणि संतुलन साधणारे स्वयंभू वैश्विक नियम. त्यानुसार वाट्याला आलेली विहित कर्मे निष्ठेने करणे, त्या कर्मांचीच फुले सर्वात्मक ईश्वराला अनन्य भावनेने अर्पण करणे ही त्या विश्वात्मक देवाची परमसेवा होईल, त्यानेच तो संतुष्ट होईल. म्हणजे त्यानेच वैश्विक संतुलन राखले जाईल... यापेक्षा दुसरी भव्य पूजा कोणती असेल?

२४.८.२०२०

***

## भाग १५

पत्रं पुष्पं फलं तोयं... या नवव्या अध्यायातील श्लोकानंतर आज एकदम पंधराव्या अध्यायातला पहिला श्लोक विचारात घेतला आहे. निष्काम कर्मयोग हा गीतेचा मुख्य विषय आहे. पण हे कर्म उपासनेसारखे श्रद्धेने करणे अपेक्षित आहे. आणि हे करत असताना आपण ज्याचे अविभाज्य घटक आहोत त्या विश्वाच्या आणि आपल्या अस्तित्वाविषयीचे ज्ञान असणेही आवश्यक आहे. आजच्या श्लोकात एका रूपकाव्दारे विश्वाचे समग्र स्वरूप लक्षात आणून दिले आहे.

गीता-

ऊर्ध्वमूलमधःशाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् ।
छन्दांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् ।।१५/१।।

गीताई-

खालीं शाखा वरी मूळ नित्य अश्वत्थ बोलिला
ज्याच्या पानांमधें वेद जाणे तो वेद जाणतो ।।१५/१।।

ज्ञानेश्वरी-

आजच्या श्लोकावर ज्ञानेश्वरीमधे ७२ ओव्या आहेत. श्लोकाचा अर्थ स्पष्ट होण्याच्या दृष्टीने त्यातील मला महत्त्वाच्या वाटलेल्या तीन ओव्या-

ते ऊर्ध्व आत्मा निर्मळे । अधोर्ध्व सूचित मूळें । बळिया बांधोनि आळें । मायायोगाचे ।।१५/९१ मग आधिली सदेहांतरे । उठती जिये अपारे । तें चौपासि घेऊनि आगारे । खोलावती ।।१५/९२ ऐसे भवद्रुमाचें मूळ । हें ऊर्ध्वीं करी बळ । मग आणियांचें बेंचळ । अधीं दावी ।।१५/९३

(या ओव्यांचा सारांशरूपात अर्थ- ब्रह्मतत्त्व आणि माया यांच्या दृढ संबंधांचे आळे तयार होऊन त्यात या वृक्षाची निर्मिती होते. असंख्य देहरूपी अंकूर फुटून त्याचा अपार विस्तार होतो. अशा या संसारवृक्षाचे मूळ (माया) ते वरच्या बाजूस म्हणजे ब्रह्माच्या ठिकाणी रुजले की फांद्यांचा विस्तार खाली सतत वाढत राहातो...)

सरळ अर्थ-

ज्याचे मूळ ऊर्ध्व (म्हणजे उच्च- अव्यक्त तत्त्वात) आहे आणि ज्याची शाखा म्हणजे अग्र

खाली (नामरूपात्मक व्यक्त सृष्टी) आहे अशा ह्या पूर्ण सृष्टीला अश्वत्थ वृक्ष म्हणतात. वेद ही या वृक्षाची पाने आहेत. जो या वृक्षाला पूर्णपणे जाणतो तो वेदवेत्ता (ज्ञानविज्ञानसंपन्न) होय.

अर्थविस्तार-

या संपूर्ण विश्वाची निर्मिती कशी झाली? या निर्मितीचे स्वरूप काय आहे? त्यातील अनेक जीवांचे स्वरूप काय?... हे सर्व यथोचित जाणणे म्हणजे ज्ञानप्राप्ती. गीतेमधे कृष्णार्जुन संवादाच्या माध्यमातून हे ज्ञान वेगवेगळ्याप्रकारे उलगडून दाखवले आहे. 'विभूतियोग' या दहाव्या अध्यायात या विश्वातील असंख्य प्रजातींचं, घटकांचं वर्णन आहे. अकराव्या अध्यायात अर्जुनाला दिव्य दृष्टी देऊन प्रत्यक्ष विश्वरूपदर्शन घडवलेलं आहे. नंतर क्षेत्र-क्षेत्रज्ञ म्हणजे शरीर आणि आत्मा यांचे स्वरूप, आणि सृष्टीचे त्रिगुणात्मक (सत्व-रज-तम या तीन गुणांनी युक्त) स्वरूप यांचे विवेचन आहे. ब्रह्मतत्त्व हे या सर्वाचे अधिष्ठान आहे... आजच्या श्लोकात एका रूपकाव्दारे या सर्वाचे दर्शन घडवले आहे.

ही संपूर्ण सृष्टी म्हणजे एक विलक्षण वृक्ष आहे. याची मुळे ऊर्ध्व- म्हणजे उच्च अशा अव्यक्त तत्त्वात आहेत. आणि त्याचा शाखा-विस्तार खाली म्हणजे निकृष्ट जड द्रव्यात आहे. माणसाच्या ज्ञानास खालील शाखा-विस्तारापासून प्रारंभ होतो आणि त्याचे अंतिम साध्य हे या वृक्षाच्या मूळापर्यंत अर्थात ब्रह्मतत्त्व जाणण्यापर्यंत पोचणे हे असते. या विश्व-वृक्षाचे आमूलाग्र ज्ञान ज्याला होते त्यालाच पूर्ण ज्ञानप्राप्ती झाली असं म्हणता येईल.

व्यवहारी जगण्यात कोणताही विषय समग्रतेनं समजून घ्यायचा तर त्याचा इतिहास आणि भूगोल (खोली आणि व्याप्ती) समजून घ्यावा लागतो. मग आपला 'स्व' हाच जर अभ्यासाचा विषय असेल तर आपण ज्याचे अविभाज्य भाग आहोत त्या विश्वाचे समग्र ज्ञान किमान बौद्धिक पातळीवर तरी होणे आवश्यक आहे. गीतेच्या अभ्यासातून हळूहळू हे साध्य होऊ शकेल असं वाटतं.

३१.८.२०२०

***

## भाग १६

गीतेतील कृष्णार्जुन संवादात कृष्ण अर्जुनाला समजावतो आहे, त्याच्या विविध प्रश्नांना उत्तरं देतो आहे. पण प्रत्येक उत्तरातून अर्जुनाच्या मनात नवा प्रश्न निर्माण होतो. त्याच्या उत्तरांमधून अधिक खोलातला तत्त्वविचार पुढे येत राहिला आणि समग्र तत्त्वज्ञान गीतारूपात आपल्यापर्यंत पोचले. गीतेच्या एकूण रचनेत क्रमाक्रमाने एकेक विषय उलगडलेला आहे. आणि शेवटी अठराव्या अध्यायात सर्व विषयांचा आढावा घेतलेला आहे. या अध्यायातले शेवटी शेवटी आलेले दोन श्लोक आज विचारात घेतले आहेत. या श्लोकांनी 'गीता आणि आपण' या उपक्रमाची सांगता होईल.

गीता-

सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।
अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ।।१८/६६।।

अर्जुन उवाच-

नष्टो मोहःस्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत ।
स्थितोऽस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव ।।१८/७३।।

गीताई-

सगळे धर्म सोडूनि एका शरण ये मज
जाळीन सर्व मी पापें तुझी शोक करूं नको ।।१८/६६।।

मोह मेला चि तो देवा कृपेनें स्मृति लाभली
झालों निःशंक मी आतां करीन म्हणसी तसें ।।१८/७३।।

ज्ञानेश्वरी-

१८/६६- तैसा मी एकवाचूनि काही । मग भिन्नाभिन्न आन नाही । सोहंबोधे तयाचा ठायी । अनन्यु होय ।।१८/१३९७ पै आपुलेनि भेदेविण । माझे जाणिजे जे एकपण । तयाचि नाव शरण । मज येणे गा ।।१८/१३९८

१८/७३- मग अर्जुन म्हणे काय देवो । पुसताति आवडे मोहो । तरी तो सकुटुंब गेला जी ठावो । घेऊनि आपुला ।। १८/१५५८ गुंतलो होतो अर्जुनपणे । तो मुक्त जालो तुझेपणे ।

आता पुसणे सांगणे । दोन्ही नाही ।।१८/१५६३

(ज्ञानेश्वरीत दोन्ही श्लोकांवर सविस्तर भाष्य आहे. त्यातील निवडक ओव्या इथे घेतल्या आहेत.)

सरळ अर्थ-

१८/६६ इतर सर्व धर्म म्हणजे मोक्षप्राप्तीची साधने संपादन करण्याचा खटाटोप सोडून तू मला एकालाच (परमेश्वरालाच) शरण जा. मी तुला सर्व पातकांपासून (कर्मबंधनांपासून) मुक्त करीन. काळजी करू नकोस.

१८/७३ अर्जुन म्हणाला, श्रीकृष्णा, तुझ्या कृपेने माझा अज्ञानजन्य मोह नष्ट झाला. आणि कर्तव्य करण्याचे ज्ञान प्राप्त झाले. आता मी संशयरहित झालो आहे. आता निःशंकपणे तुझ्या वचनाचे म्हणजे तू सांगितलेल्या कर्मयोगाचे आचरण मी करीन.

अर्थविस्तार-

जीवनातील संघर्षाला भिडताना असंख्य प्रश्न पडतात. त्यातील व्यावहारिक अडचणींना व्यावहारिक उत्तरे शोधता येतात. पण जेव्हा नैतिक पेचाला सामोरे जावे लागते आणि माणूस किंकर्तव्यमूढ होतो तेव्हा सारासार विवेकाचा आधार घ्यावा लागतो. प्रश्न जितका गंभीर आणि व्यापक तितका त्याला अधिक भक्कम वैचारिक आधार लागतो. अर्जुनापुढील पेच या स्वरूपाचा होता. त्यामुळे त्याचे थोड्या समजावण्याने समाधान होत नव्हते. त्याला सतत प्रश्न पडत होते. संपूर्ण गीतेत अर्जुनाने कृष्णाला पंधरा-सोळा प्रश्न विचारले आहेत. त्या अनुषंगाने त्रिगुणात्मक विश्वाचे स्वरूप आणि व्याप्ती, त्यातील जीवाचे (शरीर - आत्मा) स्वरूप स्पष्ट करत कृष्णाने समग्र तत्त्वविचार अर्जुनाला समजावून सांगितला. निष्काम कर्मयोग साधायचा तर आत्मसंयम, त्यासाठी योगमार्ग, उपासना मार्ग, ज्ञानमार्ग अशा विविध मोक्ष-मार्गांचे दिग्दर्शन केले. आणि शेवटी, 'इतर सर्व मोक्षप्राप्तीची साधने संपादन करण्याचा खटाटोप सोडून तू मला एकालाच शरण ये. मी तुला सर्व कर्मबंधनांपासून मुक्त करीन. काळजी करू नकोस' असा दिलासा देऊन अर्जुनाला युद्धसज्ज केले.

अर्जुनानेही कबुली दिली, 'श्रीकृष्णा, तुझ्या कृपेने माझा अज्ञानजन्य मोह नष्ट झाला. आणि कर्तव्य करण्याचे ज्ञान प्राप्त झाले. आता मी संशयरहित झालो आहे. आता मी निःशंकपणे तुझ्या वचनाचे म्हणजे तू सांगितलेल्या कर्मयोगाचे आचरण करीन.'

अर्जुन निःशंक झाला खरा पण मला प्रश्न पडला की इतकं सगळं समजावून सांगितल्यावर

शेवटी ‘मला शरण ये’ असं का म्हटलं असेल? परोपरीनं सांगितलेल्या तत्त्वज्ञानाचा एवढा भक्कम आधार कर्तव्यकर्म असलेल्या युद्धाला सामोरं जाण्यासाठी पुरेसा ठरत नाही का? की शरणभावनेमुळे ‘मी हे करतो आहे’ हा भाव गळून पडेल आणि पाप-पुण्य असा काही प्रश्नच उरणार नाही.. म्हणून ‘शरण ये’ असं म्हटलं असेल? भक्ती ज्ञानाने पूर्ण होते तसे ज्ञानही भक्तीमुळे पूर्ण होते का? कर्म ज्ञान-भक्तीयुक्त होण्यासाठी शरणभावनेची आवश्यकता आहे काय?

‘गीता आणि आपण’ या उपक्रमात काही निवडक श्लोकांच्या आधारे गीता तत्त्वज्ञानाचे धावते दर्शन घडवण्याचा प्रयत्न केला. माझ्या मांडणीत अनेकांनी अर्थपूर्ण भर घातली. या निमित्ताने या विषयावर आपला विचार झाला. या विचारांचा रियाज करत राहू... कधीतरी त्यातील मर्म आपले आपल्याला उमगेल...

७.९.२०२०

***

श्री कृष्णार्पणमस्तु...

'प्रभाते मनी' हे एक वैशिष्ट्यपूर्ण संकलन आहे. यात 'तुकोबांचा आकांत-प्रवास..', 'चांगदेवपासष्टी : एक आकलन' व 'गीता आणि आपण..' या तीन विषयांवरील उपक्रमांसाठी केलेले लेखन समाविष्ट आहे. हे उपक्रम जाहीर कार्यक्रमासाठी किंवा एखाद्या मासिकासाठी घेतलेले नव्हते तर मी सुरू केलेल्या व्हॉट्सॅप ग्रुपसाठी घेतलेले होते. आठवड्यातून एक-दोनदा घेतलेल्या या उपक्रमांना छान प्रतिसाद मिळाला. अर्थपूर्ण चर्चा झाल्या... व्हॉट्सॅपसारख्या माध्यमाचा असा विधायक आणि सर्जनशील वापरही होऊ शकतो याचा अनुभव घेता आला.

अर्थात याला या माध्यमाच्या मर्यादाही होत्या. त्यामुळे उपक्रमासाठी निवडलेले विषय व्यापक असूनही मी अगदी थोडक्यात आणि सहज समजेल अशा भाषेत लिहिलेलं आहे. हे सर्व मोबाईल स्क्रीनमागे लुप्त होऊन जाऊ नये, सलगपणे परत वाचता यावं म्हणून 'प्रभाते मनी' हे संकलन केलेलं आहे. यामधे ग्रुपवर झालेल्या चर्चांचा समावेश करता आला नाही. पण आता ते ई-पुस्तकरूपात अनेकांना वाचता येईल आणि त्यावर खुलेपणानं चर्चा होऊ शकेल...

- आसावरी काकडे

BUSINESS ICON
www.businessicon.in